सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. ०३ जून २०२५ वर्ष - तिसरे अंक ६२ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# देशात ३९७६ सक्रिय कोरोना रुग्ण

नवी दिल्ली, ०२ जून : भारतात कोरोना साथरोगाचा प्रादुर्भाव वेगाने वाढत असून सक्रिय कोरोना रुग्णांची संख्या ३९७६ झाली आहे. आरोग्य विभागाच्या वेबसाइटनुसार, गेल्या १० दिवसात कोरोना रुग्णांच्या संख्येत १५ पटींनी वाढ झाली आहे. केरळमध्ये सर्वाधिक १४३५ रुग्ण आहेत. सक्रिय रुग्णांच्या बाबतीत महाराष्ट्र ५०६ रुग्णांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे.

कोरोनामुळे मृत्युमुखी पडलेल्या लोकांची संख्या ३४ वर पोहोचली आहे. गेल्या चोवीस तासांत ६ जणांचा मृत्यू झाला आहे. अहमदाबादमध्ये सोमवारी १८ वर्षीय गर्भवती मुलगी आणि एका ४७ वर्षीय महिलेचा कोरोनामुळे मृत्यू झाला. यापूर्वी रविवारी दिल्लीत २२ वर्षीय मुलगी आणि तामिळनाडूमध्ये २५ वर्षीय मुलाचा कोरोनामुळे मृत्यू झाला होता.सतत वाढणाऱ्या रुग्णांमध्ये, कर्नाटक सरकारने एक सार्वजनिक सल्लागार जारी केला आहे. यामध्ये गर्दीच्या ठिकाणी मास्क घालण्याचे, शारीरिक अंतर राखण्याचे आणि स्वच्छतेची विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ताप, खोकला, छातीत दुखणे किंवा श्वास घेण्यास त्रास होत असल्यास, लोकांना तत्काळ चाचणी करण्यास सांगितले आहे. राज्यात २३८ सक्रिय रुग्ण आहेत.

# आजारांवर नियंत्रणासाठी आधुनिक उपचार पद्धतीसोबत संयमी जीवनशैली आवश्यक : मुख्यमंत्री

नाशिक, २ जून : नागरिकांच्या बदलत्या जीवनशैलीमुळे विविध आजारांचे प्रमाण वाढत आहे. अशा आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आधुनिक उपचार पद्धतीसोबत संयमी जीवनशैली आवश्यक आहे,असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

श्री साईबाबा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल,हार्ट इन्स्टिट्यूट ण्ड रिसर्च सेंटर नाशिकच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन,खासदार डॉ. शोभा बच्छाव,आमदार सीमा हिरे,आमदार राहुल ढिकले,आमदार हिरामण खोसकर,रुग्णालयाचे प्रमुख डॉ.अनिरुद्ध धर्माधिकारी,डॉ.पल्लवी धर्माधिकारी,अण्णासाहेब मोरे आदी उपस्थित होते.



मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले,रुग्णालयाला श्री साईबाबा यांचे नाव देण्यात आले आहे. साईबाबांचा श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र जीवनात अंगिकारता आल्यास कुठलाच आजार होऊ शकत नाही. गेल्या काही वर्षात चांगल्या चिकित्सा पद्धती विकसित झाल्याने भारतीयांचे जीवनमान वाढले आहे.

साईबाबा हॉस्पिटलमधील आधुनिक उपचार पद्धतींमुळे रुग्णांना चांगली वैद्यकीय सेवा मिळेल. सेवा करणे हा रुग्णालय काढण्यामागचा उद्देश असल्याने गरिबातील गरीब माणसाची सेवा येथे होईल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येकाला उत्तम आरोग्य लाभावे,अशा शुभेच्छा मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

# इंडिगोच्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग

## विमानाला पक्षी धडकल्यामुळे घडली घटना

रांची, ०२ जून : झारखंडची राजधानी रांची येथील विमानतळावर आज, सोमवारी इंडिगोच्या विमानाला मोठा अपघात होता होता टळला. बिहारच्या पाटण्याहून येणारे विमान लँडिंगपूर्वी एका पक्षाला धडकले. यानंतर, विमान ४० मिनिटे हवेतच ठेवण्यात आले. यानंतर, पायलटने सुरक्षितपणे इमर्जन्सी लँडिंग केले. विमानातील सर्व प्रवासी सुखरूप आहेत.

यासंदर्भात अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रांची येथील बिरसा मुंडा विमानतळावर १७५ प्रवाशांना घेऊन येणाऱ्या इंडिगो विमानाचे इमरजन्सी लँडिंग करण्यात आले. सुदैवाने सर्व प्रवासी सुरक्षित असून केवळ विमानाचेच (एयरबस ३२०) नुकसान झाले आहे. विमानतळ संचालक आरआर मौर्य यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'रांचीजवळ इंडिगोच्या विमानाची एका पक्ष्याला धडक बसली. घटनेच्यावेळी, विमान १०-१२ नॉटिकल मैल अंतरावर अर्थात ३ ते ४ हजार फूट उंचीवर होते. यावेळी एक गिधाड विमानाला धडकले. यानंतर विमानाचे इमरजन्सी लँडिंग करण्यात आले. आणखी एका सूत्राने म्हटले आहे की, पक्षाच्या धडकेदरम्यान पायलटने समयसूचकता दाखवत विमान ४० मिनिटांपर्यंत सुरक्षितपणे हवेत ठेवले.

# सिक्कीमच्या लष्करी छावणीत भूस्खलन, तिघांचा मृत्यू, ९ जवान बेपत्ता

गंगटोक : ईशान्य भारतातील राज्यांमध्ये पाऊस आणि भूस्खलनाने हाहाकार माजवाला आहे. सिक्कीममधील एक लष्करी छावणीत रविवारी (दि.१) संध्याकाळी भूस्खलन झाले. यामध्ये काही सैनिकांसह ३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे तर ९ जवान बेपत्ता असून त्यांचा शोध घेतला जात आहे. मृतांची ओळख अद्याप पटलेली नाही.

तीन जणांचा मृत्यू

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (दि.१) संध्याकाळी ७ वाजता उत्तर सिक्कीममधील चट्टन येथील लष्करी छावणीत भूस्खलन झाले. यामुळे आजूबाजूच्या परिसरात बांधलेल्या घरांचे मोठे नुकसान झाले. या भूस्खलनात तीन जणांचा मृत्यू झाला आहे, तर अनेक लोक बेपत्ता आहेत. मृतांची ओळख पटविण्यासाठी आणि बेपत्ता लोकांचा शोध घेण्यासाठी मोहीम रबवली जात आहे.



१५०० पर्यटक अडकले

उत्तर सिक्कीममध्ये मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळे परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, लोचन आणि लाचुंग भागात सुमारे १५०० पर्यटक अडकले आहेत. मंगन जिल्ह्याचे एसपी सोनम देचू भुतिया म्हणाले की, ११५ पर्यटक लाचेनमध्ये आणि १,३५० पर्यटक लाचुंगमध्ये राहत आहेत. भूस्खलनामुळे दोन्ही बाजूंनी रस्ते बंद करण्यात आले आहेत. सर्व पर्यटकांना सध्या त्यांच्या हॉटेलमध्येच राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# १५ जूनला होणाऱ्या नीट-पीजी परीक्षा स्थगित, सुधारीत तारीख लवकरच

नवी दिल्ली : राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा - पदव्युत्तर परीक्षा येत्या १५ जूनला घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. मात्र अतिरिक्त परीक्षा केंद्रे आणि आवश्यक पायाभूत सुविधा तयार करण्यासाठी राष्ट्रीय वैद्यकीय विज्ञान मंडळाने (एनबीईएमएस) उपरोक्त परीक्षा तूर्तास स्थगित केल्या असून लवकरच सुधारीत तारीख जाहीर करण्यात येईल, असे प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने एनबीईएमएसला संपूर्ण पारदर्शकता आणि सुरक्षित परीक्षा केंद्रे सुनिश्चित करून एकाच सत्रात परीक्षा घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने एनबीईएमएसने न्यायालयाच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी केंद्रांची संख्या वाढवणे आणि पायाभूत सुविधा वाढवण्याकरता काम करत आहे. पूर्ण पारदर्शकता राखली जाईल आणि सुरक्षित केंद्रे कार्यान्वित केली जातील याची खात्री करून परीक्षा एकाच सत्रात आयोजित करण्यासाठी आवश्यक व्यवस्था करण्याबाबत नियोजन करण्यात येत आहे.

# केंद्रीय मंत्री पियुष गोयल फ्रान्स दौऱ्यावर, इटलीला देणार भेट

नवी दिल्ली : केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी १ जून रोजी आपला फ्रान्सचा तीन दिवसांचा अधिकृत दौरा सुरू केला. हा दौरा १ ते ५ जून दरम्यान होणाऱ्या फ्रान्स आणि इटलीच्या दौऱ्याचा एक भाग होता. गोयल यांची ही भेट प्रमुख युरोपीय भागीदारांसोबत धोरणात्मक आणि आर्थिक संबंध अधिक दृढ करण्यासाठी तसेच मजबूत आणि समावेशक जागतिक विकासासाठी सामायिक दृष्टिकोन पुढे नेण्याप्रती भारताच्या अखंड वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

फ्रान्समधील त्यांच्या दौऱ्यादरम्यान गोयल हे फ्रान्सचे अर्थव्यवस्था मंत्री एरिक लोम्बार्ड आणि फ्रेंच व्यापार मंत्री लॉरेंट सेंट-मार्टिन यांच्यासह फ्रेंच मंत्र्यांसोबत द्विपक्षीय बैठका घेणार आहेत. भारत-फ्रेंच आर्थिक भागीदारी मजबूत करण्यावर तसेच व्यापार आणि गुंतवणूक सहकार्य वाढवण्यासाठी नवीन मार्ग शोधण्यावर या नेत्यांच्या चर्चा केंद्रित असतील.

फ्रान्सच्या उच्चस्तरीय भेटीचा एक भाग म्हणून, धोरणात्मक व्यावसायिक बैठका आणि कार्यक्रमांचा एक व्यापक अजेंडा निश्चित करण्यात आला आहे - या भेटीत विकॅट, टोटल एनर्जीज, लॉरियल, रेनॉल्ट, व्हॅलिओ, ईडीएफ आणि एटीआर सारख्या प्रमुख फ्रेंच कंपन्यांच्या वरिष्ठ सहभागी होतील, तसेच भारत-फ्रान्स व्यवसाय गोलमेज आणि भारत-फ्रान्स सीईओ फोरमचा समावेश असेल. या भेटीमुळे दोन्ही देशांतील आघाडीच्या उद्योग भागधारकांमध्ये संवाद वाढेल.

या भेटीचा एक भाग म्हणून गोयल प्रमुख आंतरराष्ट्रीय भागीदारांसह उच्चस्तरीय द्विपक्षीय बैठकांची मालिका घेतील. यात युनायटेड किंग्डमचे व्यवसाय आणि व्यापार सचिव जोनाथन रेनॉल्ड्स; सिंगापूरचे उपपंतप्रधान आणि व्यापार आणि उद्योग मंत्री गान किम योंग; आणि सौदी अरेबियाचे वाणिज्य मंत्री डॉ. माजिद बिन अब्दुल्लाह अल-कसाबी यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल, इस्रायलचे व्यापार आणि गुंतवणूक मंत्री नीर बरकत; नायजेरियाचे व्यापार, उद्योग आणि गुंतवणूक मंत्री डॉ. जुमोके ओडुवोले ओओएन; आणि ब्राझीलचे परराष्ट्र मंत्री मौरो लुईस आयकर व्हिएरा यांच्याशी देखील संवाद साधतील. धोरणात्मक आर्थिक सहकार्य वाढवणे आणि प्रदेशांमध्ये परस्पर फायदेशीर भागीदारी वाढवणे हे या संवादाचे उद्दिष्ट आहे. या संवादामुळे भारत-युनायटेड किंग्डम एफटीए वाटाघाटींना देखील महत्त्वपूर्ण चालना मिळेल.

# आता क्युआरकोडद्वारे तक्रार-सुचना नोंदवा

छत्रपती संभाजीनगर,दि.२ (जिमाका)- आपल्यावर होणारा अन्याय, कामकाजातील दिरंगाई यासाठी नागरिकांना थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविता यावी यासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यां QR नी कोड ची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. फक्त QR कोड आपल्या मोबाईल मध्ये स्कॅन करा आणि आपली तक्रार वा सुचना नोंदवा, अशी ही अभिनव संकल्पना असून आजपासून प्रत्येक तहसिल व उपविभागीय कार्यालयांमध्ये हे QR कोड प्रदर्शित करण्यात आले आहेत. तसेच आजपासून जेथे मंडळस्तरावर कार्यालये कार्यरत नव्हती तेथे मंडळ कार्यालयेही सुरु करण्यात आली आहेत.

नागरिकांना तक्रार व सूचना नोंदविताना येणाऱ्या अडचणी टाळण्यासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालये व उपविभागीय अधिकारी कार्यालयांमध्ये तक्रार पेटीशेजारी QR कोड लावण्यात आले आहेत. या QR कोडच्या माध्यमातून नागरिक आता आपली तक्रार किंवा सूचना डिजिटल पद्धतीने थेट नोंदवू शकतील. जिल्ह्यात सध्या १६ ठिकाणी तक्रार पेट्या बसविण्यात आल्या आहेत.


या उपक्रमामुळे नागरिकांना कार्यालयात येऊन तक्रार अर्ज देण्याचा त्रास टळेल. प्रवास खर्च वाचेल, तसेच, ज्यांना डिजिटल प्रणालीचा वापर शक्य नाही, अशा नागरिकांसाठी पूर्वीप्रमाणेच तक्रार किंवा सूचना लिहून पेटीत टाकण्याची सुविधाही उपलब्ध आहे. नागरिकांनी या सुविधेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. हा उपक्रम पारदर्शक, तत्पर आणि उत्तरदायी प्रशासनाकडे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

QR कोड स्कॅन केल्यावर नागरिकांनी आपली प्राथमिक माहिती (नाव, फोन नंबर इ.) भरुन आपली तक्रार वा सुचना टाईप करुन नोंदवावी. ही तक्रार अपलोड केल्यावर ती जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्षात प्राप्त होईल. ती तक्रार तात्काळ संबंधित तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येईल व तक्रारी, सुचनांच्या अंमलबजावणीबाबत पाठपुरावा व आढावा घेण्यात येईल.

## कुर्बानीसाठी तीन कत्तलखान्यांना परवानगी

छत्रपती संभाजीनगर, दि.२ - 'बकरी ईद' या सणानिमित्त कुर्बानीसाठी शहरातील तीन अधिकृत कत्तलखान्यांमध्ये परवानगी देण्यात येत असल्याचे आदेश महानगरपालिकेचे आयुक्त जी. श्रीकांत यांनी निर्गमित केले आहेत. महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३३(१) (२) व ३७८ (१) (क) चार अन्वये हे आदेश जारी केले आहेत. तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९७६ अन्वये (सुधारीत) १९९५अन्वये बकरी ईद या सणानिमित्त अधिकृत कत्तलखान्यास सकाळी ८ ते दुपारी २ यावेळात चालविण्याची परवानगी देण्यात आली आहे. कत्तलखाने व परवानगी कालावधी याप्रमाणे- शुक्रवार दि.६ रोजी प्रभाग क्रमांक ९ दाऊदी बोहरा जमात अंजुमन ए सैफी, बोहरा कब्रस्थान, दाऊदपुरा पाटीदार भवनाच्यामागे जालना रोड. शनिवार दि.७ रोजी प्रभाग क्रमांक १ पडेगाव कत्तलखाना मनपा, प्रभाग क्रमांक ३ शहाबाजार कत्तलखाना मनपा. वरील प्रमाणे अधिकृत कत्तलखान्यात परवानगी दिलेल्या कालावधी व्यतिरिक्त अन्यत्र कोठेही उघड्यावर किंवा इतरत्र जनावरांची कत्तल करु नये. उघड्यावर मांस वाहतुक करु नये. विशिष्ट कालावधीकरीता ही परवानगी असली तरी नियमितपणे चालविण्याच्या कत्तलखान्याचे सर्व नियम, अटी व शर्ती त्यासाठी लागू राहतील,असेही मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातूनग्राहक सेवा उंचावणार – अभय कुलकर्णी

## रावसाहेब दानवे यांच्याहस्ते स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या क्यूआरकोड सेवेचे विमोचन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

स्वामी विवेकानंद पतसंस्था अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्राहक सेवा उंचावण्याला प्राधान्य देत आहे, असे प्रतिपादन अध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी येथे बोलताना केले.

जनरल मर्चंट्स असोसिएशनच्या अधिवेशनात स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या क्यूआर कोड प्रणालीचे विमोचन माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते संपन्न झाले, त्याप्रसंगी श्री. कुलकर्णी बोलत होते. यावेळी भास्करराव दानवे, जनरल मर्चंट असोसिएशनचे जिल्हा अध्यक्ष हस्तीमल बंब, कॅट राज्यप्रमुख सचिन निवगुने, स्वामी विवेकानंद सचिव प्रसन्ना जाफ्राबादकर, जालना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पंच, अंकुशराव राऊत आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अभय कुलकर्णी पुढे म्हणाले की, सामान्य युवकांनी एकत्र येऊन स्वामी विवेकानंदांच्या 'युवकांनो झेप घ्या' या प्रेरणादायी विचारांवर आधारित संस्थेची स्थापना सन २००४ मध्ये केली होती. गेल्या २० वर्षांपासून संस्था विविध व्यवसायिक, सामान्य व गरजू लोकांना आर्थिक मदत पुरवते आहे. संस्था गोल्ड लोन, लॉकर सेवा, मिनी एटीएम, निफ्ट, आरटीजीएस सेवा तसेच मोबाईल ॲपद्वारे डेली कलेक्शन यांसारख्या आधुनिक सेवा देत आहे. याच वाटचालीचा पुढचा टप्पा म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ''लोकल फोर व्होकल'' या संकल्पनेला अनुसरून क्यूआर कोड पेमेंट सुविधा उपलब्ध करून दिली ही सेवा आपल्यातीलच तसेच आपल्या स्थानिक संस्थेने दिलेली असल्याने जास्तीत जास्त वापर करावा. बँकिंग अधिक सुलभ, सुरक्षित आणि डिजिटल करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. या सेवेचा ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.



## संक्षिप्त

### गट विकास अधिकारी यांच्या निष्क्रियतेचा निषेध; संभाजी ब्रिगेडने मंठाच्या वतीने गोड जेवणाचा 'चौदाव्याचा' कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**मंठा / प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील गट विकास अधिकारी तेरा दिवस उलटूनही सुरू आंदोलनाची दखल घेत नाहीत, ही बाब लोकशाहीची थट्टा ठरत आहे. प्रशासन झोपेत आहे की मुद्दाम जनतेकडे पाठ फिरवत आहे? या निष्क्रीय आणि अक्षम प्रशासनाला जागं करण्यासाठी आज संभाजी ब्रिगेड मंठाच्या वतिने थेट 'चौदाव्याचा' कार्यक्रम साजरा करत तीव्र निषेध व्यक्त केला. या कार्यक्रमात गट विकास अधिकाऱ्याच्या फोटोला हार घालून, अगरबत्ती आणि गोड जेवण ठेवून त्यांना ''गोड झोपेलेले'' संबोधत टोला लगावण्यात आला. हा फक्त निषेध नव्हे, तर प्रशासनाच्या मुर्दाड संवेदनांवरचा चपराक होता. संभाजी ब्रिगेडने स्पष्टपणे सांगितले की, आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलन करत आहोत. पण जर प्रशासनाने अजूनही कानाडोळा केला, तर संभाजी ब्रिगेड च्या स्टाईल ने उत्तर देण्यात येईल! प्रशासनाने जर जाग येऊन आंदोलनाची दखल घेतली नाही, तर संभाजी ब्रिगेड या निष्क्रीय व्यवस्थेला खडबडून जागं करण्यासाठी पुढील टप्प्यात अधिक तीव्र आंदोलन करणार, असा इशारा देण्यात आला आहे.

### जागतिक तंबाखु नकार दिनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाभरामध्ये विविध स्तरावर तंबाखु व पदार्थ सेवनाचे दुष्परिणामाविषयी जनजागृती करण्यासाठी व कोटपा २००३ कायद्याची अंमलबजावणी विविध विभागासोबत करण्यासाठी राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम राबविला जातो. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जालना सामान्य रुग्णालयाच्या वतीने १ मे ते ३१ मे २०२५ या कालावधीत जागतिक तंबाखु नकार दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन आले. ३१ मे जागतिक तंबाखु विरोधी दिनानिमित्त जिल्हा सामान्य रुग्णालय येथे सिग्नेचर कॅम्पेन, सेल्फी पॉईट चे उद्घाटन, नर्सिंग विद्यार्थी यांच्यासाठी पोस्टर स्पर्धा व जनजागृतीपर रॅली, विधीसेवा प्राधिकरण जालना यांचे व्याख्यान व तंबाखु विरोधी शपथ असे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्था ठिकाणी संस्थेतील सर्व अधिकारी- कर्मचारी यांच्याद्वारे विरोधी शपथ घेण्यात आली. जालना येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिक्षक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. राजेंद्र गाडेकर यांनी मार्गदर्शन केले. नशाबंदी मंडळाचे बिसमिल्ला सय्यद, विधिसेवा प्राधिकरणचे ॲड. योगेश कुलकर्णी, जिल्हा सल्लागार डॉ. संदिप गोरे, समुपदेशक सोनाजी भुतेकर, सामाजिक कार्यकर्त्या सुनंदा कोरडे, समुपदेशक प्रमोद व इतर अधिकारी- कर्मचारी हे उपस्थित होते. असे जिल्हा शल्यचिकित्सक तथा सदस्य सचिव (जिल्हास्तरीय समन्वय समिती) राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम, जिल्हा रुग्णालय जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### दहिपुरी मध्ये आज सत्यभामा सिताराम हनवते परिवाराकडून गरजूंना पंधरा किटचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**अंबड / प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील दहीपुरी येथील सत्यभामा सिताराम हनवते यांच्याकडून गोरगरीब तसेच गरजूंना त्यांनी आज पंधरा किटचे वाटप



केले आहे. यामध्ये गहू ,तांदूळ ,साखर, तेल ,चहापत्ती, रवा, शेंगदाणे, गुळ, अशा विविध १५ वस्तू या किटमध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या अगोदर सुद्धा त्यांनी कोरोना काळामध्ये गोरगरीब जनतेला धान्य तसेच किट वाटप केलेले आहे. यावेळी उपस्थित पोलीस पाटील गौतम लिहिणार, श्री एस एस कंपनी मुंबईचे उद्योजक बाबासाहेब सीताराम हनवते, ठकाराम सीताराम हनवते, मनोज वाघमारे, महेश अबोकर, गणेश अवधूत दांडेकर, निखील हनवते तसेच संपादक दै./सा. जालना कालनिर्णयचे प्रताप गायकवाड, संपादक साप्ताहिक भारतीय एकता अखंडता चे राहुल गायकवाड, पुण्यनगरीचे ग्रामीण प्रतिनिधी गायके हे देखील यावेळी उपस्थित होते. याबद्दल गरजूंनी हनवते परिवाराचे आभार मानले आहे.

## पारध बु.येथील स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर, संतप्त ग्रामस्थांचे पारध ग्रामपंचायतला निवेदन

वार्ड क्रमांक चार मध्ये नाल्या नसल्यामुळे सांडपाणी गल्लीतच साचत आहे, गेल्या पंधरा हे पाणी साचल्यामुळे या पाण्याचा घाण वास येऊ लागला व त्यातच काल रात्री पाणी पडल्यामुळे शेजारी असलेल्या लोकांच्या घरात पाणी शिरायला लागलं होतं, त्या पाण्यामुळे मच्छर मोठ्या प्रमाणात वाढले डेंगू, मलेरियाची धास्ती लोकांनी घेतली घेतली आहे,आज ग्रामपंचात वर जाऊन सरपंच साहेबांना निवेदन दिले आहे साहेबांनी आता तरी लक्ष देऊन पाण्याची विल्हेवाट लावावी.
( जयवंता लोखंडे ,ग्रामस्थ,पारध)

आज आम्ही गटार तुंबलेल्या पाण्यासंदर्भात ग्रामपंचायतला निवेदन दिले जर ग्रामपंचायतीने निवेदनाची दखल नाही घेतली तर येणाऱ्या आठ दिवसात ग्रामपंचायतवर आंदोलन करू व आरोग्याच धोका निर्माण झाला तर याला ग्रामपंचायत सर्वस्वी जिम्मेदार राहील.
पवन लोखंडे (भा.ज.यु. मो.कार्यकर्ता)



**तभा वृत्तसेवा**
**पारध / प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पारध बु.येथे घाणीचे साम्राज्य गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नालीअभावी प्रत्येकाच्या घरासमोर ठिकठिकाणी पाणी साचल्याने काही ठिकाणी तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. हा प्रश्न घेऊन पारध बू.येथील संतप्त ग्रामस्थांनी शुक्रवार रोजी थेट ग्रामपंचायतला जाऊन सरपंचांना निवेदन दिले.

सदर निवेदनात असे नमूद केले आहे की,गल्ल्यांमध्ये नाल्या तुंबल्या आहे हे पाणी बाकी पंधरा दिवसांपासून साचलेले आहे.पाण्याचा वास सुद्धा येऊ लागला आणि काल रात्री पाऊस पडल्यामुळे हे पाणी घरात शिरू लागले, गल्लीतल्या सर्व नागरिकांना ह्या पाण्यातून जावं लागत आहे,तसेच स्वच्छता केवळ नावाला राहिली असल्याचे चित्र दिसून येत आहे. गावात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरल्याने साथीचे रोग पसरत आहेत. अनेक नागरिकांना साथीच्या आजारांना तोंड द्यावे लागत भविष्यात नागरीकांना गंभीर आजार होण्याची भितीही व्यक्त होत आहे.याकडे ग्रामपंचायत जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतांना दिसत आहे. प्रत्येक गल्लीत जागोजागी कचरा व पाण्याचे डबके साचले असून, नाल्या तुंबलेल्या आहेत.

नागरीकांना रस्त्यावर चालणे कठीण झाले असून दुर्गंधीही सुटल्याने मोठा त्रास सहन करावा लागत आहे. घाणीमुळे नागरीकांना साथीच्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. दुर्लक्षामुळे साथीच्या आजारांना निमंत्रण मिळत असल्याने याचे दुष्परिणाम मात्र गावातील जनतेला भोगावे लागत आहेत. वरिष्ठांनी याकडे तात्काळ लक्ष द्यावे अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. यावेळी निवेदन देताना जयवंत लोखंडे, अशोक काटोले,सुनील बेराड, उत्तम लोखंडे,विकास लोखंडे,पवन लोखंडे, गणेश तेलंग्रे,सागर काटोले,तुळशीदास धनवई,महेंद्र ठेंग,समाधान बोराडे, रामदास लोखंडे, गणेश देशमुख व ग्रामस्थ उपस्थित

## वक्फ बोर्डाच्या जागेवर पोलीसांच्या मदतीने अतिक्रमण

### अतिक्रमण धारकाला मदत करणारे पोलीस उपनिरिक्षक साबळे यांना करा : शेख जावेद शेख बाबु

**तभा वृत्तसेवा**
**जालना /प्रतिनिधी**

वक्फ बोर्डाच्या जागेवर गेल्या बारावर्षापासुन नियमित भाडेकरु असतांना देखील या जागेवर डोळा ठेवुन लोकांनी पोलीसांना हाताशी आमचे शेड उखडुन फेकुन उलट आमच्यावर खोटे नाटे गुन्हे दाखल करण्याची सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरिक्षक साबळे यांनी दिली असल्याचे गाळे धारक जावेद यांनी छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक यांच्याकडे दिलेल्या निवेदनात म्हटलं असुन या पोलीस उपनिरिक्षकाची चौकशी करु निलंबित करण्याची मागणी करण्यात आली. या संदर्भात दिलेल्या निवेदनात शेख जावेद शेख बाबु यांनी म्हटले आहे की, सन २०१२ पासून सदर जागेवर भाडेकरू असून गैरअर्जदाराने पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांना हाताशी धरत अतिक्रमण आपल्यावर खोटे गुन्हे दाखल केलेले आहे. सदरील जागेवरील शेड पोलीस उपनिरिक्षक अनंतसिंग साबळे आणि दोन पोलीस कर्मचाऱ्यांनी उखडून टाकला. आम्ही त्यांना तक्रार नोंदवुन घ्या असे सांगितले. परंतु त्यांनी आमची तक्रार नोंदवून तर घेतलीच नाही उलट आम्हाला अरेरावीची भाषा करून तेथून हाकलून दिले. श्री साबळे यांनी देशमुख व इतरांशी संगनमत व आर्थिक देवाण घेवाण करत गुन्हे दाखल केलेले आहे. वक्फ संस्था दर्गा हजरत जानुल्ला शाह कादाबाद जालना ता. जि. जालना ही वक्फ संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४३ अन्वये नोंदणीकृत असून ज्याचा नोंदणी क्रमांक. १०९/२०१२ असा आहे. तसेच महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने त्यांचे कडील आदेश ९६१५/२०२२ दि. १२ २०२२ रोजी घटना मंजूर करून सदर वक्फ संस्थेचा व वक्फ संस्थेच्या मिळकतीचे व्यवस्थापन वक्फ संस्थेच्या व्यवस्थापन समितीस हस्तांतर केले आहे. सदरील संस्थाने आम्ही सर्व ५ अर्जदारांना नियमाप्रमाणे दि. ५ मार्च २०२५ रोजी ११ महिन्याकरिता भाडेकरारनामा करून दिलेला आहे. यापुव आम्ही ऑगस्ट २०१२ मध्ये जा. क्र. ३२२/३०४०/२०१२ महाराष्ट्र राज्य वक्फ औरंगाबाद अन्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे अर्जदारांना भाडेतत्त्वावर दिलेले आहे. सदर जागेची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्रात दि. २१ जून १९७३ साली दर्गा हजरत जानुल्ला शाह, सर्वे नं. २३६ मध्ये एकूण ७ एकर १३ गुंठे मधील फक्त ३००० चौ. फुट जागेचा वक्फ मंडळाकडून आम्ही ५ अर्जदारांनी भाडेतत्त्वावर घेतलेली परंतु आमच्या भाडेतत्त्वावर घेतलेल्या प्लॉटवर दिनकर मारोतराव देशमुख व भगवान मारोतराव देशमुख व संदीप देशमुख यांनी अवैधरित्या वाहने उभे करून दमदाट्या करीत आहे. पोलीस उपनिरिक्षक श्री साबळे यांनी अधिकाराचा गैरवापर करून आमच्यावर अन्याय केलेला आहे.

## बिडीओ तांगडे तुम्ही चक्क पंचायत समितीलाच बनवल कचरा डेपो ?

### पंचायत समितीच्या रोहयो घरकुल , चौकशी समिती योजनेवरील अभियंते लाभार्थीना पैस्याची मागणी करण्याचे प्रकारात वाढ









**तभा वृत्तसेवा**
**परतुर / प्रतिनिधी**

परतुर पंचायत समितीचे निष्क्रीय गट विकास अधिकारी तांगडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर पंचायत समितीच्या अनेक विभागातील अधिकारी शाषणाच्या योजनांचा लाभ देण्यासाठी लाच मागत आसल्याचे प्रकार वाढले आहेत . या लाचलुचपत देण्या घेण्याचे प्रकार विकास अधिकारी तांगडे यांना माहिती आसताना यावर कोणतेही उपाय करणे ऐवजी बिडीओ तांगडे सर्रास दुलर्क्ष करीत आसल्याने वंचित बहुजण आघाडीच्या कार्यकर्ते रविंद्र भदर्गे यांनी खुद परतुर पंचायत समितीच्या बिडीओ यांची तत्कार केली आहे . परतुर पंचायत समितीचे निष्क्रीर्य गट विकास अधिकारी राजेश तांगडे यांनी पदभार घेतल्यानंतर अधिकारी वर्गासह पंचायत आकारात गुटख्यांच्या पिचकाऱ्या तर विविध योजनांचा फाईल कचरा गोळा केल्यासारखे धुळखात पडल्या आहेत . महत्वाचे दस्ताऐवज अधिकाऱ्यांच्या उपासिन धोरणांमुळे महत्वाच्या फाईल्सचे ढिगारे पंचायत समितीच्या घरकुल विभागातील कार्यालयात तसेच कार्यालया बाहेर खराब होत आसुन त्या ढिगाऱ्यावर ये जा करणारे लाभार्थी तसेच अधिकारी वर्ग या महत्वाच्या फाईल्सवर गुटखा खावून पिचकाऱ्या मारत आहेत . अति महत्वाचे कागदपत्रे असे उघड्यावर ठेवून त्यावर घाण करण्यावर कोणाचेही लक्ष नाही .

## धर्मदाय आयुक्त कार्यालयापर्यंत रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून देणार:आ. अर्जुनराव खोतकर

### आश्वासनानंतर ॲड. महेश धन्नावत यांचे उपोषण मागे

**वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

सहाय्यक धर्मदाय आयुक्त व सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या दुरवस्थेबाबत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश धन्नावत यांनी आज सोमवार दि. २ जून रोजी सुरू केलेल्या उपोषणाला शहरातील विविध सामाजिक, व्यापारी, धार्मिक व कायदेशीर संस्थांचा भक्कम पाठिंबा लाभला. दरम्यान, आ. अर्जुनराव खोतकर यांनी या रस्त्याच्या कामासाठी उपलब्ध करून देण्याचे लेखी आश्वासन दिल्यामुळे ॲड. धन्नावत यांनी आपले उपोषण मागे घेतले. डीपीटीसीच्या माध्यमातून हा रस्ता तातडीने केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयापर्यंत पक्का रस्ता नसल्यामुळे वकील, पक्षकार, कर्मचारी, न्यायिक अधिकारी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत होता. याविषयी अनेक वेळा देऊनही कारवाई न झाल्याने ॲड. धन्नावत अखेर आंदोलनाचा मार्ग अवलंबला होता. या लढ्याला विविध मान्यवर आणि संघटनांनी प्रत्यक्ष उपोषण स्थळी येऊन पाठिंबा दर्शवला. दरम्यान, आ. अर्जुन राव खोतकर हे शहरात नसल्याने त्यांनी शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णु पाचफुले व मेघराज चौधरी यांना पाठवुन सदर रस्त्यासाठी निधी उपलब्ध करुन देऊ, असे दिले. भाजपाचे जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे यांनीदेखील सदर रस्त्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांशी बोलून चर्चा केली. जिल्हाधिकाऱ्यांनी डिपीडीसी अंतर्गत हा रस्ता तयार करण्याचे तोंडी आश्वासन दिले. त्यानंतर ॲड. धन्नावत यांनी उपोषण मागे घेतले.

उपोषण स्थळी भेट देऊन मराठवाडा मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष बाबा उगले, ॲड. कल्पना त्रिभुवन, जालना क्रेडाईचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार, जालना महासंघ अध्यक्ष सतीश पंच, व्यापारी महासंघाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष हस्तीमल बंब, महाराष्ट्र मुस्लिम शाह फकीर संघटनेचे अध्यक्ष शेख इस्माईल, वकील संघाचे माजी अध्यक्ष लक्ष्मण उढान, राहुल चंदन, परमेश्वर गडगिळ, डी.पी. पाटील, ॲड. शुभम भारुका, ॲड. महेश गाडेकर, ॲड. ब्रह्मानंद चव्हाण, ॲड. बालाजी मंत्री, ॲड. एकनाथ शिंदे, ॲड. प्रभाकर राजूपुत, ॲड. धन्नावत, ॲड. निलेश खांडेकर, ॲड. अरविंद मुरमे, धर्मदाय वकील संघ अध्यक्ष ॲड. मुजम्मिल, ॲड. अमजद पठाण, ॲड. आरिफ अली, विपुल दातार, जगताप, मयूर अग्रवाल, गणेश लूटे,लिटिगंट्स असोसिएशनचे नरेंद्र मोदी, जालना क्रेडाईचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार, चेतन मराठे, मनिष तवरावाला, बापूसाहेब उगले, श्याम सारस्वत, हरिनारायण जैस्वाल , शेख मेहमूद, धर्मदाय संघ, कामगार न्यायालय वकील संघ, आदींनी उपोषणाला पाठिंबा दर्शविला.

हा रस्ता केवळ वकिल व कर्मचाऱ्यांसाठीच नव्हे, तर सर्वसामान्य जनतेसाठी अत्यावश्यक आहे. ही लढाई आता जनतेची झाली आहे, असे ॲड. महेश धन्नावत यांनी उपोषण मागे घेताना नमूद केले. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि जनतेच्या समाजाच्या एकत्रित प्रयत्नाने अखेर ही मागणी मान्य करण्यात आहे. या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## अवकाळी पावसाने शेती पिकांना फटका ; रानडुकरांचा मोठा त्रास

### भुईमूग पिकांच्या नुकसानीचे पंचनामा करण्यास प्रशासनाची टाळटाळ

**तभा वृत्तसेवा मंठा/ प्रतिनिधी**

यावर्षी मे महिन्यातच पावसाने कहर केला असून अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या भुईमूग पिकाला मोठा फटका बसला आहे. पाटोदा, केदारवाकडी परिसरातील शेतकऱ्यांनी तहसीलदार आणि कृषी अधिकाऱ्याकडे नुकसानीचे पंचनामे करण्याकरिता धाव घेतली असता तालुका प्रशासनाने शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेतली नाही. केदारवाकडी परिसरातील पंडितराव बोराडे यांच्या एक एकरमधील भुईमूग अतिवृष्टीने भुईसपाट झाले. त्यामुळे त्यांचे चाळीस हजाराचे नुकसान झाले. मे महिन्यात शेतीची मशागतीची कामे मोठ्या प्रमाणावर शेतकरी करतात. परंतु यावर्षी मे महिन्यातील अतिवृष्टीमुळे शेतीची कामे करता आली नाहीत. आता थोडी उघडीप दिल्याने शेतकरी शेतीच्या कामाला लागले आहेत. मात्र अवकाळीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे पंचनामे करून त्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

**भुईमूग पिकाचे प्रचंड नुकसान**

**पंडितराव बोराडे... यावर्षी मे महिन्यातील अतिवृष्टीने शेतकरी हवालदिल झाला आहे. केदारवाकडी शिवारातील भुईमूग पिकाचे मोठे नुकसान झाले असून प्रशासनाने तात्काळ पंचनामे करावेत अशी मागणी येथील शेतकरी पंडितराव बोराडे यांनी केली आहे.**



सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## ७ वर्षीय मुलाच्या मूत्रमार्गामधील खडे काढून टाकले

अहमदनगर – पुण्यातील खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी ७ वर्षीय मुलावर यशस्वी उपचार केले, ज्याला वारंवार मूत्रमार्गाच्या संसर्गाचा (यूटीआय) त्रास होत होता, जसे लघवी करताना जळजळ होणे आणि अनेक महिने पोटदुखी. गेल्या वर्षी या मुलाने अनेक हॉस्पिटल्समध्ये उपचार केला आणि त्याला तात्पुरता आराम मिळाला. रुग्णाला खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले आणि डॉक्टरांना आढळून आले की त्याच्या मूत्रमार्गात मोठे खडे आहेत. बाहेरून केलेल्या अल्ट्रासाऊंडमध्ये डावीकडील खालच्या मूत्रमार्गात १२ मिमीचा खडा आढळून आला आणि ओपन सर्जरी करण्याचा सल्ला देण्यात आला. खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमधील युरोलॉजी सल्लागार डॉ. अंकित शर्मा यांच्या नेतृत्वाखालील टीमने केलेल्या सीटी केयूबी स्कॅनमध्ये हे दुर्मिळ निदान झाले.

## मॅक्स फॅशन सादर करत आहेत डिस्नेच्या ट्रॉपिकल कलेक्शन

मुंबई – डिस्नेच्या बहूप्रतिक्षित लिलो ॲण्ड स्टिचच्या चित्रपटगृहातील प्रदर्शनाच्या पार्श्वभूमीवर मॅक्स फॅशनने मुले, किशोरवयीन आणि तरुणांसाठी त्यांचे नवे कलेक्शन सादर केले आहे. या नव्या आकर्षक कलेक्शनमध्ये बेटांवरील उत्साह आणि ट्रॉपिकल प्रदेशातील सौंदर्य सुंदररित्या एकत्र करत सर्वांसाठीच फार आकर्षक आणि फ्रेश स्टाइल सादर केली आहे. आम्ही साधारण दशकभरापूर्वी डिस्ने थीम असलेले कलेक्शन पहिल्यांदा सादर केले आणि डिस्नेच्या कालातीत कथांनी आम्हाला कायमच प्रेरणा दिली आहे, असे मॅक्स फॅशनचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुमीत चंद्रा म्हणाले. क्लासिक सिनेमांची प्रेरणा असल्याने आमचे छोटे ग्राहक या कलेक्शनसोबत मोठ्या प्रमाणावर जोडले जातात. आमचे नवे 'लिलो ॲण्ड स्टीच'थीमचे कलेक्शन म्हणजे डिस्नेसोबतच्या दमदार सर्जनशील सहकार्याचे प्रतिबिंब आहे.

## रेडिको खेतान 'त्रिकल' ब्रँडचे नाव मागे घेणार

मुंबई – , रेडिको खेतानने त्यांच्या अलिकडेच घोषित केलेल्या 'त्रिकल' ब्रँडबद्दल उपस्थित झालेल्या प्रश्नांना गांभीर्याने घेतले आहे आणि त्यांचे नाव मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनीच्या अधिकृत प्रवक्त्याने सांगितले की, हा निर्णय केवळ व्यावसायिक निर्णय नाही तर देशवासीयांच्या भावनांचा आदर करण्याच्या वचनबद्धतेचा पुरावा आहे. 'त्रिकल' हा संस्कृत शब्द आहे, ज्याचा अर्थ आहे – भूतकाळ, वर्तमान आणि भविष्यकाळ यांचे संयोजन. भारताच्या समृद्ध वारसा, संस्कृती आणि कारागिरीला आदरांजली वाहण्याच्या भावनेने हे नाव प्रेरित झाले आहे. भारतीय कारागीर आणि संस्कृतीच्या माध्यमातून देशाचा शाश्वत आत्मा जगासमोर आणण्यासाठी हा प्रयत्न करण्यात आल्याचे कंपनीचे म्हणणे आहे.

## सायकल हे केवळ प्रवास करण्याचे साधन नाही

या जागतिक सायकल दिनी, सोनी सबचे उत्साही कलाकार शब्बीर अहलूवालिया, नवीन पंडिता, शीहान कपाही आणि देशना दुगड सांगत आहेत, सायकल चालवून मिळणाऱ्या मौज, फिटनेस आणि स्वातंत्र्याविषयी. या कलाकारांसाठी सायकल हे केवळ प्रवास करण्याचे साधन नाही, तर सायकल चालवणे हा त्यांचा आवडीचा विषय आहे, ज्याच्यामुळे त्यांच्या शरीराला ऊर्जा मिळते, मन स्वच्छ होते आणि व्यक्त जीवनात एक वेगळाच आनंद मिळतो. शब्बीर तर सेटवरच सायकल घेऊन येतो, किंवा नवीन सायकलवरून लांब फेरफटका मारून निसर्गाचा आनंद घेतो, देशना स्क्रीन–टाइम टाळून सायकल चालवत स्वतःमध्ये रमते तर शीहानची सायकलशी निगडीत एक हृदयस्पर्शी आठवण आहे. प्रत्येक जण सांगत आहे की, सायकल हा कसा त्यांच्या जीवनातील एक अर्थपूर्ण भाग बनला आहे. बघू ते काय सांगताहेत–

## 'जिवोरा'– कापसाच्या पिकासाठी 'नेक्स्ट जनरेशन' कीटकनाशक

छत्रपती संभाजीनगर : आपला कीटकनाशक पोर्टफोलिओ विस्तारण्यावर लक्ष केंद्रित करून क्रिस्ट्ल क्रॉप प्रोटेक्शन लिमिटेड (सीसीपीएल) या भारतातील आघाडीच्या कृषी–रासायनिक उत्पादन कंपनीने सखोल संशोधन करून विकसित केलेला कीटकनाशकाचा नवीन प्रकार बाजारात आणत असल्याची घोषणा आज केली. भारतातील पीक–संरक्षण बाजारपेठ २०२५ मधील २.५९ अब्ज डॉलर्सवरून ४.३५ टक्के सीएजीआरने वाढून २०३० सालापर्यंत ३.२१ अब्ज डॉलर्सपर्यंत जाणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात असतानाच कंपनीने या उत्पादनाची घोषणा केली आहे. ही वाढ आणखी पुढे नेण्यासाठी आणि या विभागातील बाजारपेठेतील आघाडीची कंपनी हे स्थान आणखी भक्कम करण्यासाठी सीसीपीएलने आज जिवोरा हे अत्याधुनिक कीटकनाशक बाजारात आणत असल्याची घोषणा केली.

## ऑलिंपियाड परीक्षेत परभणीच्या विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी

परभणी: जगातील सर्वात मोठे ऑलिंपियाड असलेल्या सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय ऑलिंपियाड परीक्षेत परभणीतील दोन विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय क्रमांक मिळवला आहे. अद्वैत स्कूल ऑफ एक्सलन्स ॲडलिन ब्राउन आणि योगेश विष्णू कदम या दोघांनीही आंतरराष्ट्रीय इंग्रजी ऑलिंपियाडमध्ये तिसरा क्रमांक मिळवला आणि आंतरराष्ट्रीय कांस्य पदक आणि प्रमाणपत्र मिळवले. या वर्षीच्याऑलिंपियाडमध्ये ७२ देशांतील सुमारे लाखो विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता ज्यामध्ये परभणीतील १८००० हून अधिक विद्यार्थ्यांचा समावेश होता. सहभागींमध्ये परभणीतील अनेक नामांकित शाळांचा समावेश होता ज्यात डोगिरी ग्लोबल अकादमी, श्री छत्रपती शिवाजी पी.ई. स्कूल यांचा समावेश होता.

## सूर्यापासून मातीपर्यंत: सौरऊर्जेवर शेती

मुंबई, २ जून २०२५ – अवादा ग्रुप सध्या महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या (एमएसकेव्हीवाय) अंमलबजावणीत सक्रिय आहे. ही योजना कृषी क्षेत्रात सौर ऊर्जेद्वारे आमूलाग्र बदल घडवून आणण्याचा उद्देश बाळगते. या पुढाकाराच्या माध्यमातून अवादा राज्यातील कृषी क्षेत्रासाठी शाश्वत ऊर्जा हस्तांतरण सक्षम करत आहे आणि ग्रामीण महाराष्ट्रातील जीवनमानात विकेंद्रीत(डीसेंट्रलाइज्ड) सौर ऊर्जेद्वारे सकारात्मक बदल घडवत आहे. ही योजना प्रथम २०१७ मध्ये सुरू झाली होती, ज्यामध्ये कृषिप्रधान उपकेंद्राजवळ सौर प्रकल्प उभारून शेतकऱ्यांना दिवसाकाठी विश्वासार्ह वीजपुरवठा मिळावा, असा उद्देश होता. योजनेच्या प्रभावी परिणामांची दखल घेत, महाराष्ट्र शासनाने एमएसकेव्हीवाय २.० (मिशन २०२५) अंतर्गत या योजनेचा विस्तार केला आहे. या टप्प्यात, २०२५ पर्यंत राज्यातील ३०% कृषी फीडर सौर ऊर्जा आधारित करण्यासाठी ७,००० मेगावॅट सौर क्षमतेच्या अंमलबजावणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## चक्रवर्ती सम्राट पृथ्वीराज चौहान' मालिका ४ जूनपासून



छत्रपती संभाजीनगर – सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजन वर 'चक्रवर्ती सम्राट पृथ्वीराज चौहान'. ही ऐतिहासिक मालिका ४ जूनपासून सुरू होत असून दर सोमवार ते शुक्रवार रात्री ७:३० वाजता प्रसारित करण्यात येईल. ही केवळ इतिहासाच्या पानांमध्ये अडकलेली कथा नाही, तर तो आपल्या राष्ट्राचा वैभवशाली वारसा आहे, जो पडद्यावर साकार होत आहे. कोवळ्या वयात राज्याच्या भार शिरी घेणारा पृथ्वीराज चौहान आपल्या राष्ट्राचे रक्षण करण्याबाबत अत्यंत दक्ष होता. आजही इतिहासातील एक अत्यंत भयंकर खलनायक मोहम्मद घोरी आणि पृथ्वीराज चौहान यांच्यात झालेल्या भीषण युद्धाविषयी बोलले जाते. आणि त्यावेळी आपले मन अभिमानाने भरून येते. एक योद्धा म्हणून त्याच्याकडे शस्त्रास्त्रे तर होतीच, पण सुजाणता आणि दूरदृष्टी ही त्याची मोठी शस्त्रे होती. कर्तव्याने प्रेरित होऊन निर्भीड निर्णय घेण्याची क्षमता, मनातील अथांग करुणा आणि मातृभूमी आणि प्रजाजन यांच्याविषयीची समर्पित वृत्ती यांनी पृथ्वीराज चौहानचे चरित्र घडले आहे. या मालिकेत जेष्ठ अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे पृथ्वीराजच्या आजीची, राजमातेची भूमिका करत आहे, जिने एक वीर योद्धा म्हणून त्याची जडणघडण केली.

# सिल्लोड तालुका दूध संघाची निवडणूक बिनविरोध

### चेअरमन पदी देविदास पा. लोखंडे तर व्हाईस चेअरमन पदी सय्यद सत्तार बागवान यांची निवड



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.२, सिल्लोड तालुका शेतकरी सहकारी दूध संघाच्या सन २०२५–२६ ते २०३० – ३१ या वर्षासाठी नूतन संचालक मंडळाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत शिवसेनेचे सर्वच एकूण १४ संचालक बिनविरोध निवडून आले. संचालक मंडळाच्या निवडीनंतर चेअरमन पदासाठी देविदास पा. लोखंडे तर व्हाईस चेअरमनपदी सय्यद सत्तार बागवान यांचा प्रत्येकी एकच अर्ज प्राप्त झाल्याने तालुका दूध संघाच्या चेअरमन पदी देविदास पा. लोखंडे, व्हाईस चेअरमनपदी सय्यद सत्तार यांची बिनविरोध निवड झाली.

या निवडीबद्दल आमदार अब्दूल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय सेना भवन येथे आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते नवनिर्वाचित चेअरमन, व्हाईस चेअरमन व संचालकांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, माजी पं. स.सदस्य शेख सलीम, नॅशनल सह. सूतगिरणीचे संचालक विशाल जाधव, तालुका दूध संघाचे नवनिर्वाचित चेअरमन देविदास पा. लोखंडे, व्हाईस चेअरमन सय्यद सत्तार, संचालक राहुल गव्हाणे, समाधान भुईगळ, शेख अब्दुल रहीम ,दत्ता कुडके, साहेबराव गोराडे ,संजय राकडे, महादु दुधे, नय्युम पटेल, श्रीमती शबाना खान, श्रीमती राधिका कुदळ, ईश्वर जाधव ,जीवनसिंग जाधव आदींची उपस्थिती होती.

# आ. बंब यांचा राजस्थान प्रकोष्ठकडून नागरी सत्कार

छत्रपती संभाजीनगर : भाजप राजस्थान प्रकोष्ठ व महिला प्रकोष्ठच्या वतीने शनिवार, ३१ मे गंगापुर–खुलताबाद मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांचा सकल राजस्थानी समाजाच्या वतीने औक्षण करून, राजस्थानी पगडी, पुष्पहार, शाल, सम्मानचिन्ह देऊन नागरी सत्कार करण्यात आला. खडकेश्वर येथील हॉटेल क्रिष्णा ईनमध्ये हा कार्यक्रम पार पडला, यावेळी आमदार बंब यांनी भाजप प्रकोष्ठच्या पदाधिकाऱ्यांसोबत मनमोकळा संवाद साधला.

आमदार बंब यांनी यावेळी अनेक महत्वपूर्ण बाबींवर प्रकाश टाकला. आपल्या दारात भीक मागण्यांसाठी आलेल्या लोकांसोबत चांगल्या प्रकारे वागा, भीक नाही दिली तरी चालते, पण त्यांना अपमानास्पद वागणूक देवू नका. शक्य झाल्यास आपल्या घरातील असंघटित कामगारांच्या अत्यावश्यक गरजा भागविण्यास हातभार लावा, असे विविध उदाहरणे देत त्यांनी थोडक्यात संपत्तीचा वापर, विनियोग स्वत:सोबत आपल्या कर्मचाऱ्यांसाठीही करण्याचा हितोपदेश बंब यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविषयी त्यांची श्रध्दा आणि विश्वास वाखाणण्याजोगा आहे.

राजस्थान प्रकोष्ठच्या मागील एक–दीड वर्षातील विविध सामाजिक व राजकीय कार्याचा आढावा घेत आमदार बंब यांनी संपूर्ण प्रकोष्ठ टीमची मुक्तकंठाने प्रशंसा करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. 'राजस्थानी समाज गाथा एवं कर्मयोगी पुरस्कार' या उपक्रमाच्या स्टँडीचे विमोचन आमदार बंब यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन सी. एम. शर्मा यांनी, तर नंदकिशोर मालपाणी यांनी मानले. मारवाडी महासभेचे अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम दरख, मिठालाल कांकरिया, झुंबरलाल पगारिया, आर. बी. शर्मा, सत्यनारायण अग्रवाल, महावीर पाटणी, रामकरण कापड्या, विजयकुमार गौड, सचिन करवा, रामलाल दायमा, सतीश लढ्ढा, उमेश गौड, अभिषेक कयाल, पदमसिंह राजपुरोहीत, अरुण राठी, राजेंद्र बुरडक, सोमनाथ तांबी, विपिन गुजराणी, दिनेश दरख, ड विशाल निमोदिया, जगदीश जांगिड, सुदर्शन जाजू, महिला अध्यक्ष ललिता करवा, चंचल करवा, दीपाली भराडिया, मनिषा भंसाली, चंदा वर्मा, संगीता शर्मा, मनिषा भारूका, अर्चना चांगल, अंकिता अग्रवाल, भाग्यश्री यादव, अनुश्री लोहाडे आदी उपस्थित होते.

# मोठ्यांचे विचार नेहमी काळजीपुर्वक आचरणात आना : मिर्झा अफसर बेग

### तब्बल ३८ वर्षानंतर भेटले वर्गमित्र घृष्णेश्वर विद्यालयात स्नेह संमेलन उत्साहात



खुलताबाद प्रतिनिधी : मोठ्यांचे विचार नेहमी काळजीपुर्वक आचरणात आणले पाहिजे यामधुन आयुष्यातील हे अनुभव नेहमी प्रेरणादायी ठरतात असे विचार सेवा निवृत्त शिक्षक मिर्झा अफसर बेग यांनी खुलताबाद येथे घृष्णेश्वर महाविद्यालयात स्नेहसंमेलन कार्यक्रमात मांडले खुलताबाद येथील घृष्णेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे १९८७ साली दहावी वर्गात शिक्षण झालेल्या विद्यार्थ्यांचा स्नेह मिलन सोहळा रविवार रोजी पार पडला, ३८ ते ३९ वर्षांपूर्वीच्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा मिळाल्याने आणि आपल्या गुरुजनांच्या व वर्गमित्र मैत्रिणींच्या एक दिवसीय सहवासाने प्रत्येक जण भाऊक झाला होता. या कार्यक्रमासाठी घृष्णेश्वर विद्यालयाचे सेवानिवृत्त व तात्कालीन शिक्षक मिर्झा अफसर बेग, शिक्षक भगवान सोळुंके , शिक्षक जयंत खैरनार, शिक्षक दिलीप चव्हाण, शिक्षिका एस बी पाटील यांची प्रामुख्याने उपस्थिती होती,

रविवार रोजी घृष्णेश्वर विद्यालयात १९८७ सालीच्या दहावी विद्यार्थ्यांचा स्नेह मिलन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला सर्व विद्यार्थ्यांनी एकत्रित येत आपल्या गुरुप्रती कृतज्ञता म्हणून गुरु पूजन केले, उपस्थित माजी विद्यार्थी व तात्कालीन शिक्षकांच्या मनोगत मधून ३८ वर्षांपूर्वीचा कालखंड जसाच्या तसा डोळ्यासमोर उभा राहिल्याचे चित्र दिसले .

माजी विद्यार्थ्यांनी स्नेह भेटीची आठवण म्हणून १९८७ सालीचा वर्ग मित्रांचा व मैत्रिणींचा ग्रुपचा काढलेला फोटो फ्रेम सर्व वर्ग मित्रांना व मैत्रिणींना सप्रेम भेट देण्यात आला सर्वांच्या स्नेहभोजनाची व गुरुजनांच्या मार्गदर्शनाची व्यवस्था शाळेच्या प्रांगणात करण्यात आली होती,

यावेळी १९८७ साली वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांना शिकवणारे सेवा निवृत्त शिक्षक मिर्झा अफसर बेग सर, शिक्षक भगवान सोळुंके , शिक्षक जयंत खैरनार, शिक्षक दिलीप चव्हाण, शिक्षिका एस बी पाटील, उप अभियंता शेख वाहेद,

तसेच १९८७ सालीचे दहावी वर्ग मित्र तथा न्यायाधीश संजय चव्हाण मुख्यध्यापक संजय वरकड,माजी नगरसेवक निसार पठाण, पत्रकार शेख जमीर, शिक्षक बाबासाहेब बारगळ, शाखा अभियंता राजेश राजगुरू,शिक्षिका ललिता मेवाळ, शिक्षका आशा गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले

# ११ व्या अजिंठा–वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.२ : देशभरातील चित्रपट दिग्दर्शक व निर्मात्यांना सुवर्णसंधी देणारा ११ वा अजिंठा–वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (–खत्रऋ) दिनांक २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत छत्रपती संभाजीनगर येथे पार पडणार आहे. या महोत्सवासाठी ' भारतीय स्पर्धागट' विभागांतर्गत चित्रपट पाठविण्यासाठी प्रवेशिका मागविण्यात येत आहेत.

२०१४ मध्ये मराठवाड्यातील चित्रपटकार, समीक्षक, कलाकार व सांस्कृतिक कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन सुरू केलेल्या या महोत्सवाने आजवर राष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा प्राप्त केली आहे. 'मराठवाडा आर्ट, कल्चर अँड फिल्म फाउंडेशन'च्या वतीने, नाथ ग्रुप, महात्मा गांधी मिशन व यशवंतराव चव्हाण सेंटर यांच्या सहकार्याने हा महोत्सव आयोजित करण्यात येतो. भारत सरकारच्या सूचना एवं प्रसारण मंत्रालय, छत्रऊऋ, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र रंगभूमी, चित्रपट व सांस्कृतिक विकास महामंडळ यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

पात्रता निकष: – १ सप्टेंबर २०२४ ते ३१ ऑगस्ट २०२५ दरम्यान तयार झालेल्या किंवा १ सप्टेंबर २०२४ नंतर प्रदर्शित झालेल्या चित्रपटांना प्रवेश देण्यात येईल.

दिग्दर्शक व निर्माते भारतीय असणे आवश्यक. आंतरराष्ट्रीय सह–निर्मितीत एक निर्माता भारतीय असावा.

पुरस्कार: सुवर्ण कैलास सर्वोत्कृष्ट भारतीय चित्रपट : स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व १,००,००० रोख रक्कम., रजत कैलास पुरस्कार (सर्वोत्तम अभिनेता, अभिनेत्री व पटकथा) : प्रत्येकी २५,००० रोख, ट्रॉफी व प्रमाणपत्र., काही निवडक चित्रपटांना फिप्रेसी पुरस्कारासाठी पात्रता मिळू शकते., सर्व चित्रपट प्रेक्षक निवड पुरस्कारासाठी पात्र असतील.,

महत्त्वाचे आकर्षण: मराठवाड्यातील युवा दिग्दर्शक व एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्ट्सच्या विद्यार्थ्यांचे लघुपट सादरीकरण., ख्यातनाम चित्रपट दिग्दर्शक, तंत्रज्ञांसोबत मास्टरक्लासेस व संवाद सत्र., फिप्रेसी इंडिया चॅप्टरच्या सहकार्याने कार्यशाळा., पोस्टर प्रदर्शन, चर्चासत्रे,

प्रवेशिका सादर करण्याची शेवटची तारीख: अर्ली बर्ड डेडलाईन : ३१ जुलै २०२५, रेग्युलर डेडलाईन : ३१ ऑगस्ट २०२५

प्रवेशिकेसाठी अधिक माहिती व फॉर्म www.aifilmfest.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. लिंक : https://aifilmfest.in/entry-form-aiff-2026 अधिक माहितीसाठी infoaifilmfest.in या ईमेलवर संपर्क साधता येणार आहे.

चित्रपटप्रेमी, कलाकार व तंत्रज्ञ यांच्यासाठी ही पर्वणी ठरणारा अजिंठा–वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आहे. हा महोत्सव चित्रपट प्रदर्शनाचे नव्हे तर संवाद, ज्ञानवर्धन आणि सांस्कृतिक समृद्धीचे व्यासपीठ आहे.

संपर्क: अमित : ९९७०४ ६८२४९ किशोर : ९८९०५ ४००८८

## बिडकीन पंचक्रोशीतील बांधकाम कामगार व वयोवृद्धांना वयवंदना ६१० कार्डचे मोफत वाटप



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २ जून पैठण तालुक्यातील बिडकीन येथील वरद हॉस्पिटल ण्ड आयसीयू चे संचालक डॉ.सुरेश जंगले यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आज दि १ जून बांधकाम व इमारत कामगार योजनेच्या लाभार्थ्यांना तसेच ७० वर्षांपुढील ज्येष्ठ वयोवृद्धांना वयवंदना डिजिटल कार्डचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी बिडकीन आणि परिसरातील इमारत कामगार ३५० लाभार्थी व वय वंदना कार्डचे २६० लाभार्थी यांनी या शिबिरात सहभाग घेऊन आपली नोंदणी करून घेतलीया कार्यक्रम प्रसंगी बोलताना डॉ.सुरेश जंगले म्हणाले की महाराष्ट्र शासन व भारत सरकारच्या अनेक जनकल्याणकारी योजना आहेत त्या योग्य लाभार्थ्यापर्यंत व गरजू पर्यंत पोहोचण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे या आज माझ्या वाढदिवसा प्रसंगी या दोन्ही योजनेच्या लाभार्थ्यांना मोफत डिजिटल कार्ड द्वारे आरोग्याचा मोफत लाभ मिळण्यासाठी हा उपक्रम आम्ही राबवला त्यामध्ये अनेक गरजू वृद्धांनी समक्ष येऊन हे कार्ड काढले याचा मला मनस्वी आनंद आहे. यावेळी रुणालयातील सर्व कर्मचारी व बिडकीन परिसरातील विविध पक्षाचे तसेच संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मान्यवरांनी डॉ. सुरेश जंगले यांचा सत्कार करून त्यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे अभिवादन कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर : लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या अकराव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त लोकनेते गोपीनाथराव मुंडे स्मृती समितीच्या वतीने , दिनांक ३ जून २०२५ वार सोमवार रोजी सायंकाळी सहा वाजेपासून ते रात्री दहा वाजेपर्यंत अभिवादन कार्यक्रम आयोजित केला आहे , हा कार्यक्रम शासकीय दुध डेअरी प्रांगण येथील लोकनेते गोपीनाथराव मुंडे नियोजित स्मारकाच्या जागी सदरील कार्यक्रम मागील दहा वर्षापासून सातत्याने होत असतो , या कार्यक्रमाला सर्वपक्षीय नेते , सर्व शहरातील सन्माननीय व्यक्तिमत्व या कार्यक्रमाला उपस्थित असतात , उद्योजक , राजकारणी , माध्यम क्षेत्रातील व शैक्षणिक क्षेत्रातील सर्व सन्माननीय व्यक्ती , वकील , प्रशासनामधील उच्च पदस्थ अधिकारी व सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित असतात , या वर्षी देखील सर्वांनी नियोजित स्मारकाच्या जागी अभिवादन कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे ,असे आव्हान लोकनेते गोपीनाथराव मुंडे स्मृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे .

## सोयगाव बस आगारातून चालक माधव पाटील सेवानिवृत्त



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२ जून : सोयगाव बस आगारातील चालक माधव पाटील हे पंचवीस वर्षे बस सेवा करून आज दि.३१ मे शनिवार रोजी एसटी बस सेवेतून सेवानिवृत्त होत असून त्यांना मित्र परिवाराच्यावतीने भेट घेऊन त्यांना फुल गुच्छ,शाल, भेटवस्तू देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी पेन्शनर संघटनेचे अध्यक्ष आबासाहेब बावस्कर,पत्रकार शेख सुलेमान,जयराम सूर्यवंशी,वर्जन जाधव,योगेश बोखारे,बळीराम चव्हाण,सह मित्रपरिवार उपस्थित होते

## डॉ.कराड यांनी घेतला औट्रम घाट भुयारी मार्ग, गॅस पाईपलाईनसह विविध विषयांचा आढावा

छत्रपती संभाजीनगर, दि.२(जिमाका)– औट्रम घाटातील वाहतुक सुलभ करण्यासाठी करावयाचा भुयारी मार्ग, शहरात घरगुती गॅस साठी करावयाची पाईप लाईन व गॅस वितरण, छावणी परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक अशा विविध विषयांचा आढावा आज खासदार डॉ. भागवत कराड यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीस अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, उपवनसंरक्षक सुवर्णा माने, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे प्रकल्प संचालक रविंद्र इंगोले. व्यवस्थापक संघर्ष, जी. राममोहन, भारत पेट्रोलियमचे अक्षय वढवा, मनोज जाधव, तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तर अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया हे दुरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

छत्रपती संभाजीनगर शहरात तसेच औद्योगिक वसाहतीतील उद्योगांना लागणारा गॅस हा पाईपलाईन द्वारे करता यावा यासाठी प्रकल्प सुरु आहे. त्याचा आढावा घेण्यात आला. शहरातील १० झोन पैकी पहिल्या टप्प्यात ४ झोन मध्ये येत्या सप्टेंबर महिन्यात किमान १० हजार घरांना पाईपलाईनद्वारे गॅस पुरवठा करण्याचे नियोजनाबाबत आढावा घेण्यात आला.

तसेच औट्रम घाटात राष्ट्रीय महामार्गासाठी भुयारी मार्ग करण्याच्या कामाचाही आढावा घेण्यात आला. रेल्वेलाईन साठी व महामार्गासाठी भुयारी मार्ग करण्याबाबत आढावा घेण्यात आला. यासाठी रेल्वे विभाग व राष्ट्रीय महामार्ग विभाग यांनी स्वतंत्रपणे प्रकल्प अहवाल तयार करावा,अशी सुचना देण्यात आली.

शहरातील छावणी परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वास्तव्य असलेल्या बंगला क्रमांक ९ येथे स्मारक करण्याबाबत कॅन्टोनमेंट कडून परवानगी मिळाली असल्याचे यावेळी सांगण्यात आले. त्याच सोबत वेरूळ येथे मालोजीराजे गढी, शहाजीराजे स्मारक तसेच घृष्णेश्वर मंदिर परिसरातील अहिल्यादेवी कुंड याबाबतही आढावा घेण्यात आला.

# असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियामार्फत सर्जन्स वीकचे आयोजन

### देशभरात विविध उपक्रमांचे आयोजन;१५ जून रोजी राष्ट्रीय सर्जन्स दिवस

छत्रपती संभाजीनगर, दि.२ : असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाच्यावतीने 'सर्जन्स वीक' या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय स्तरावरील उपक्रम रविवार, दिनांक ८ जून ते रविवार, दिनांक १५ जून २०२५ दरम्यान संपूर्ण देशभर साजरा करण्यात येणार असल्याची माहिती असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाचे (एएसआय) अध्यक्ष डॉ.प्रविण सूर्यवंशी यांनी आज येथे दिली. दरवर्षी १५ जून रोजी 'राष्ट्रीय सर्जन्स दिवस' साजरा केला जातो. सर्जन्स वीक साजरा करण्यामागचा उद्देश सर्जन्सच्या योगदानाचा सन्मान करणे, जनजागृती घडवणे आणि नव्या पिढीला प्रेरित करणे हा आहे.

यावेळी, एमजीएम मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ.राजेंद्र बोहरा, औरंगाबाद सर्जिकल सोसायटीचे अध्यक्ष सत्यजित पाथ्रीकर व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

सर्जन्स वीक दरम्यान देशभरात मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे, जनजागृती मोहीमा, मोफत शस्त्रक्रिया, सार्वजनिक व्याख्याने, सर्जन्ससाठी आरोग्य तपासणी, वृक्षारोपण, शाळांमध्ये आरोग्य विषयक उपक्रम, सर्जन्सच्या कुटुंबीयांसाठी कार्यक्रम, तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. १४ जून रोजी विशेषतः रक्तदान दिन म्हणून ओळखला जात असल्याने त्या दिवशी रक्तदानाचे महाशिबिर होणार आहे.

सर्जन्स हे केवळ वैद्यकीय शस्त्रक्रिया करणारे तज्ञ नसून ते समाजासाठी आरोग्य रक्षक म्हणून कार्य करतात. त्यांच्या अचूकतेने, चिकाटीने आणि सेवाभावी वृत्तीने अनेकांचे जीव वाचवले जातात. भारतात सर्जरीचा इतिहास सुश्रुत यांच्यापासून सुरू होतो. त्यांनी इ.स.पू. २६०० मध्ये 'सुश्रुत संहिता' हा ग्रंथ लिहून आधुनिक सर्जरीचे मूलतत्त्व मांडले. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेत डॉ.बी. सी.रॉय, डॉ.मुथुलक्ष्मी रेड्डी (भारताच्या पहिल्या महिला सर्जन), आणि कर्नल के. जी.पांडालई (एएसआयचे संस्थापक) यांसारख्या थोर व्यक्तींनी आधुनिक भारतीय सर्जरीला दिशा दिली.

एएसआय ही भारतातील सर्वांत मोठी सर्जन्सची संस्था असून, ३८,००० हून अधिक सर्जन्स संस्थेचे सदस्य आहेत. संस्थेचे मुख्यालय चेन्नई येथे असून देशभरातील सर्व राज्यांतील सर्जन्स या संस्थेशी जोडलेले आहेत. या वर्षी 'सर्जन्स वीक' चा समारोप सोहळा रविवार, १५ जून २०२५ रोजी रुक्मिणी सभागृह, छत्रपती संभाजीनगर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. या कार्यक्रमात एएसआयचे माजी पाच अध्यक्ष विशेष उपस्थित राहणार आहेत.

एएसआयच्या नेतृत्वाखाली संपूर्ण देशभरात विविध शाखा, विभाग आणि शहरांमध्ये सर्जन्सना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी सोशल मीडिया, स्थानिक वृत्तपत्रे, टीव्ही आणि इतर माध्यमांतून मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राष्ट्रीय सर्जन्स दिवस आणि सर्जन्स वीक निमित्त केवळ सामाजिक उपक्रम आयोजित केले जात नसून हा सर्जन्सच्या योगदानाचा राष्ट्रीय गौरव आहे. ही संधी आहे समाजाशी अधिक जवळीक साधण्याची, सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याची आणि आरोग्यसेवा क्षेत्रात नवा विश्वास निर्माण करण्याची.

रविवार, दिनांक १५ जून २०२५ रोजी होणाऱ्या समारोप समारंभावेळी असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाचे खालील माजी अध्यक्ष उपस्थितीत राहणार आहेत :

१. डॉ.आर.पी.श्रीवास्तव, अध्यक्ष एएसआय (२००९), २. डॉ.दिलीप गोडे, अध्यक्ष एएसआय (२०१८), ३. डॉ.अरविंद कुमार, अध्यक्ष एएसआय (२०१९), ४. डॉ.पी.रघु राम, अध्यक्ष एएसआय (२०२०), ५. डॉ.अभय दळवी, अध्यक्ष एएसआय (२०२१), ६. डॉ.संजय कुमार जैन, अध्यक्ष एएसआय (२०२३), ७. डॉ. प्रबल नेवगी, अध्यक्ष एएसआय (२०२४).

औरंगाबाद सर्जिकल सोसायटी तर्फे राष्ट्रीय सर्जन्स वीकमध्ये आयोजित करण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती खालीलप्रमाणे :

दिनांक, ९ जून २०२५ : उद्घाटन समारंभ, दिनांक १० जून २०२५ : योग शिबिर, दिनांक ११ जून २०२५ : जनजागृतीपर कार्यक्रम, दिनांक १२ जून २०२५ : रांगोळी स्पर्धा, दिनांक १३ जून २०२५ : मोफत ओपिडी तपासणी, दिनांक १४ जून २०२५ : सर्जन्स रक्तदान शिबिर, दिनांक १५ जून २०२५ : वृक्षारोपण, गायन स्पर्धा आणि समारोप समारंभ.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# आसुरी आनंदाचे धनी

भारत जगात असा एकमेव देश असेल जेथे काही प्रतिकूल घटना घडल्यास आनंद व्यक्त करणारे काही घटक आहेत. हे गेल्या एका तपापासून वारंवार घडत असल्याचे उघडपणे दिसत आहे. यासाठी लोकशाहीत सर्वांना भावना व्यक्त करण्याचा, मते मांडण्याच्या अधिकाराचा आधार घेतला जातो. त्यात चूक काहीच नाही, पण मते मांडताना भेदभाव नसावा ही अपेक्षाही आहेच. शेवटी चूक ही चूकच असते. मग, सत्ताधाऱ्यांनी केले ते वाईट आणि विरोधकांनी केले ते चांगले, असे नाही. ८ जुलै २०१६ रोजी काश्मीर खोऱ्यातील कोकेरनाग येथे सुरक्षा दलाशी झालेल्या चकमकीत २१ वर्षीय दहशतवादी बुरहान वानी ठार झाला. या घटनेनंतर देशभरात नुसता गदारोळ उठला होता. लष्कराच्या कार्यशैलीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. बुरहानच्या समर्थनार्थ देशाच्या काही विशिष्ट भागात मोर्चेही निघाले होते. डाव्या विचारांचा गड मानल्या गेलेल्या विद्यापीठांमध्ये भारतविरोधी घोषणाबाजी करण्यात आली होती. पाकिस्तानात तर बुरहान पोस्टरबॉय ठरला. १६ जुलैच्या घटनेनंतर तब्बल सहा महिने काश्मीर अशांत होते. २४ फेब्रुवारी २०१७ रोजी खोरे थोडेफार शांत झाले होते. याशिवाय केरळ, प. बंगालमध्येही बुरहानच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करण्यात आली होती. वास्तविक पाहता बुरहान हा हिजबूल मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनेचा कमांडर होता. तसेही प्रत्येक दहशतवाद्याचे नाव हे सुरक्षा जवानाच्या गोळीवर कोरलेले असते. बुरहान काही समाजसेवक नव्हता. काश्मिरात त्याला समर्थन मिळणे समजू शकते पण देशातील सर्वांत मोठा विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसचे तत्कालीन खासदार सैफुद्दीन सोज यांनी उघडपणे या दहशतवाद्याचे समर्थन केले होते. त्यावेळीही कित्येक डाव्या आणि देशविरोधी शक्तींनी केंद्रातील एनडीए सरकारवर टीकास्त्र सोडले होते. तथाकथित राजकीय सल्लागार सुधींद्र कुलकर्णी यांनी तर नागा बंडखोरांशी चर्चा होऊ शकते तर पाकिस्तान आणि काश्मिरी बंडखोरांशी का नाही, अशी भूमिका मांडली. मानवतावादी संघटना रस्त्यावर उतरल्या होत्या. पण, याच संघटनांना आपल्याच घरातून निर्वासित झालेल्या लाखो काश्मिरी पंडितांचे मानवीय अधिकार आठवले नाहीत. विरोधकांचा हा दुटप्पीपणा आता उघडा पडला आहे.

जनता आता राजकीयदृष्ट्या सजग झाली आहे. मते व्यक्त करणारी वर्तमान युवकांची पिढी जागृत असून देशाला काय हवे आणि देश कुणाच्या हातात सुरक्षित आहे, याची जाणीव त्यांना आहे. देशाच्या सुरक्षेसंबंधात एखादी घटना घडत असेल तर सत्ताधारी आणि विरोधक निदान या मुद्यावर एकत्र यावेत, अशी अपेक्षा असते. दहशतवादी हल्ल्यांचे राजकारण केले जाते तेव्हा चीड येते. उरी, पुलवामा, बालाकोट, पहलगाम आणि ऑपरेशन सिंदूरबाबतही जेव्हा विरोधक राजकीय पोळी शेकण्याचा प्रयत्न करतात तेव्हा ते त्यांच्याच पायावर धोंडा पाडून घेत असतात. अशाप्रसंगी ट्रोल आर्मीही सक्रिय असते. एका विशिष्ट विचारधारेचे जनमत तयार करण्यात ही ट्रोल आर्मी मोठी भूमिका निभावत असते. भारतीय सेनादलाने केलेल्या उरी आणि बालाकोट सर्जिकल स्ट्राईकचे पुरावे मागण्यात काँग्रेससह देशातील सर्वच विरोधी पक्ष सर्वांत पुढे होते. पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यासाठी वापरलेली स्फोटके कुठून आली, असा प्रश्न विरोधक आजही विचारत असतात. वास्तविक पाहता विरोधकांचा हा त्रागा ते सत्तेपासून दूर असल्यामुळे होत आहे हे उघड आहे. लागोपाठ तीन लोकसभा निवडणुकीत पराभूत झाल्याने कसेही करून सत्तेत येण्याचा मार्ग शोधण्याची धडपड होय. पहलगाम हल्ल्यानंतर दहशतवादी आणि त्यांचा पाठीराखा असलेल्या पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी ऑपरेशन सिंदूर आखण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लष्कराला मोकळे सोडले. लष्कराने व्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांचे अड्डे जमीनदोस्त केले. एवढेच नव्हे तर पाकिस्तानने ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रांनी आपल्या हवाई तळांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केल्यानंतर भारताने जोरदार प्रत्युत्तर देत त्यांच्या १३ हवाई तळांचे प्रचंड नुकसान केले. पाकिस्तानला अमेरिकेकडे याचना करावी लागली. हल्ले थांबवा, अशी विनंती भारताकडे करावी लागली. या अवघ्या ९० तासांच्या संघर्षात पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख जनरल आसीम मुनीर यांच्या डोक्यावरील भारताला पराभूत करण्याचे भूत उतरले. या छोट्याशा संघर्षात राफेलसह भारताची सहा लढाऊ विमाने पाडल्याचा दावा पाकिस्तानने केला. अर्थात एकाही भारतीय विमानाचा मलबा पाकिस्तान दाखवू शकले नाही.

संघर्षात किती विमाने कोसळली यापेक्षा ती का कोसळली हे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे, असे सीडीएस अनिल चौहान यांनी एका टीव्ही चॅनलला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे. आम्ही त्वरित चूक सुधारली आणि दोनच दिवसांनी विमानांनी उड्डाण केल्याचे वक्तव्य केले. पण, यामध्ये त्यांनी लढाऊ विमान हा शब्दही उच्चारला नाही. पण, दुसऱ्या बाजूला त्यांनी पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या, भारताची सहा विमाने पाडल्याचा दावा खोडूनही काढले. याप्रसंगी सर्वांना महाभारतातील कौरव-पांडव युद्धातील धर्मराज युधिष्ठिराच्या नरो वा कुंजरोवा या वाक्याची आठवण येते. विमाने पडल्याची कबुली अप्रत्यक्षपणे सीडीएस चौहान यांनी दिली पण ती लढाऊ होती की अन्य विमाने हे स्पष्टपणे सांगितले नाही. ८ मे रोजीच्या संघर्षात पाकिस्तानने ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रांनी तुफान मारा केला. यावेळी पाकिस्तानी तयारीचा मागोवा घेण्यासाठी आणि त्यांच्या हवाई संरक्षण यंत्रणेला चकविण्यासाठी भारताने डमी विमाने पाठविल्याच्या बातम्याही प्रसारित झाल्या होत्या. राफेल अथवा सुखोई समजून पाकिस्तानने डमी विमानेच पाडली असावीत, असा अंदाज बांधला जाऊ शकतो. कारण, त्याच दिवशी मग पाकिस्तानचे अवॅक्स विमान पडल्याच्या बातम्याही प्रसारित झाल्या होत्या. पाकिस्तानची हवाई संरक्षण यंत्रणा भेदण्यासाठीच भारताने डमी विमाने पाठविली आणि शत्रू इथेच फसला, असाही सीडीएस अनिल चौहान यांच्या वक्तव्याचा अर्थ निघतो. म्हणूनच तर विमाने किती पडली याचे सोडा, का पडली, यावर आमचा भर होता आणि मग रणनीतीत बदल करीत पुढच्या दोन दिवसांत जोराचे हवाई हल्ले केले, असे सीडीएस म्हणाले.

काँग्रेस आणि विरोधकांना छिद्रात बोट घालून ते मोठे करण्याची सवयच जडली आहे. चौहान यांच्या वक्तव्यानंतर काँग्रेस, तृणमूलसह अन्य विरोधी पक्ष केंद्र सरकारवर तुटून पडले आणि कारगिल युद्धाप्रमाणे याही संघर्षाची चौकशी करण्याची मागणी करू लागले. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांच्याशिवाय काँग्रेसचेच जयराम रमेश आणि राष्ट्रीय जनता दलाचे मनोज कुमार झा यांनीही केंद्र सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. सीडीएस अनिल चौहान यांच्या वक्तव्यानंतर अनेक गंभीर प्रश्न उत्पन्न झाले आहेत. सरकारने चौकशीसाठी विशेषज्ञांची समिती नेमावी आणि संसदेचे विशेष अधिवेशन बोलवावे, अशी मागणी खडगे यांनी केली आहे. विरोध करणे हे काँग्रेस आणि त्यांच्या इको सिस्टिमचे काम असले तरी सीडीएस चौहान यांनी नेमके काय म्हटले आहे, हे मात्र, सोयीस्करपणे विसरले आहेत. किती आणि कोणती विमाने पडली याचा कोणताही स्पष्ट उल्लेख केला नसताना काँग्रेसने गदारोळ सुरू केला आहे. पंतप्रधान देशाची दिशाभूल करीत असल्याचा आरोप करणे सुरू केले आहे. भारतीय लष्कराची जगभरात स्तुती होत असताना काही नतद्रष्ट ऑपरेशन सिंदूर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर प्रश्न उपस्थित करीत आहेत. युद्धात दोन्ही बाजूंची हानी अपरिहार्य आहे. पण, शेवटी विजय कुणाचा झाला आणि युद्धाचे परिणाम काय झाले हे महत्त्वाचे असते. ऑपरेशन सिंदूरचे परिणाम हे दीर्घकालीन आहेत. किराणा पर्वतराजीत ब्रह्मोसने हल्ला करून भारताने, पाकिस्तान आतापर्यंत सातत्याने अणुबॉम्बची जी भीती दाखवीत होता, ती भीतीच आता कायमची निकालात काढलेली आहे, हे विरोधकांनी समजून घेतले पाहिजे. ▮

## दिल्ली दिनांक

# भारत-बांगलादेश 'व्यापारयुद्ध'!

**रवींद्र दाणी**

भारत-पाकिस्तान यांच्यात झालेल्या 'लघु युद्धानंतर', भारत-बांगलादेश यांच्यात 'व्यापारयुद्ध' सुरू झाले असल्याचे दिसते. बांगलादेशने याची सुरुवात केली. भारतात आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर त्याने शुल्क लावण्याची घोषणा केली. नंतर भारताने यास प्रत्युत्तर देत बांगलादेशात निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर निर्यातशुल्क लावण्याची घोषणा केली.

बांगलादेशात शेख हसीना सरकारचे पतन झाल्यापासूनच दोन्ही देशांतील संबंधात कटुता येणे सुरू झाले होते. आता त्याचा वेग वाढला आहे असे दिसते. ताज्या घटनाक्रमात बांगलादेशने भारताशी झालेला १८० कोटींचा संरक्षण करार रद्द करण्याची घोषणा केली आहे.

**नोव्हेंबर-२०२६** : बांगलादेशला संयुक्त राष्ट्राने अति अविकसित देशाचा दर्जा दिला आहे. याचे अनेक फायदे बांगलादेशला मिळत होते. आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्था, युरोपातील देश यांच्याकडून बांगलादेशला भरपूर मदत मिळत होती. बांगलादेशातून युरोपातील देशांमध्ये पाठविल्या जाणाऱ्या वस्तूंवर कोणतेही शुल्क आकारले जात नव्हते. स्वाभाविकच बांगलादेशला युरोपात एक मोठी बाजारपेठ मिळाली होती. त्यामुळे पाकिस्तानच्या तुलनेत बांगलादेशचा आर्थिक विकास झपाट्याने होत गेला. याचा परिणाम म्हणजे बांगलादेशचा अति अविकसित देशाचा दर्जा नोव्हेंबर-२०२६ मध्ये संपविण्याचा निर्णय संयुक्त राष्ट्राने घेतला आहे.

**ओढा चीनकडे** : स्वाभाविकच बांगलादेशने नोव्हेंबर २०२६ नंतरच्या स्थितीचा अंदाज व आढावा घेणे सुरू केले आणि यात भारतापेक्षा चीन चांगला या निष्कर्षाप्रत सध्याचे सरकार आल्यानंतर त्याने चीनशी व्यापार संबंध वाढविणे सुरू केले. बांगलादेश सरकारचे हंगामी प्रमुख मोहम्मद युनूस यांनी बीजिंगला भेट देत चीनने बांगलादेशातील आपला आर्थिक प्रभाव वाढवावा असे निमंत्रण दिले. चीन-बांगलादेशात आर्थिक संबंध वाढविणारे ९ करार दोन्ही देशांत करण्यात आले. यात पाकिस्तानशीही आर्थिक संबंध वाढविण्याचा निर्णय बांगलादेशने घेतला. याचा परिणाम म्हणजे भारत-बांगलादेशच्या आर्थिक संबंधात तणाव निर्माण होणे सुरू झाले आणि आता त्याची परिणती व्यापारयुद्धात होत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. आणि ही स्थिती येणाऱ्या काळात अधिक चिघळण्याची चिन्हे आहेत.

**टर्कीला प्रक्षेपणास्त्रे** : भारत-पाकिस्तान चकमकीत टर्कीने पाकिस्तानला उघड मदत केली. आता आणखी एका ताज्या घडामोडीत अमेरिकेने अत्याधुनिक अशी 'ॲमरम' प्रक्षेपणास्त्रे टर्कीला विकण्याचा निर्णय घेतला आहे. टर्की हा नाटो संघटनेचा सभासद असला तरी त्याचे



पाकिस्तानशी असलेले लष्करी संबंध जगजाहीर आहेत. तरीही अमेरिकेने हा निर्णय घेतला आहे हे विशेष. भारत-पाक चकमक सुरू होण्यापूर्वीच टर्की लष्कराची मालवाहू विमाने पाकिस्तानात पोहोचू लागली होती. भारतात याची प्रतिक्रिया उमटली. भारतातील काही पर्यटन कंपन्यांनी टर्कीवर बहिष्कार घालण्याची घोषणा केली.

**ग्रेटर बांगलादेश** : आता टर्कीचा पाठिंबा असणाऱ्या सल्तनत-ए-बांगला या गटाने एक वादग्रस्त नकाशा जारी केला असून त्यात भारताच्या पूर्वोत्तर भागाचा काही भाग सल्तनत-ए-बांगला असा दाखविला आहे. यात म्यानमारचे अराकान राज्य आणि भारतातील बिहार, झारखंड व ओडिशा यांनाही ग्रेटर बांगला देशचा भाग म्हणून दाखविण्यात आले आहे. ढाका विद्यापीठाच्या सभागारात हा नकाशा सर्वप्रथम लावण्यात आला असल्याचे निदर्शनास आले.

**टर्की-बांगलादेश** : दरम्यान टर्कीनेही बांगलादेशशी लष्करी संबंध वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजे एकीकडे टर्कीने पाकिस्तानला लष्करी साहित्याचा पुरवठा केला. आता टर्की बांगलादेशात आपले लष्करी हातपाय पसरविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसते.

**नवे त्रिकूट** : बांगलादेशच्या ताज्या भूमिकेने चीन किती सक्रिय झाला आहे याची कल्पना करता येईल. भारताच्या विरोधात- चीनने पाकिस्तान, चीन व बांगलादेश असे त्रिकूट तयार करण्याची व्यूहरचना राबविली व त्यात तो यशस्वी होत असल्याचे दिसते. म्हणजे चीन लडाखची सीमा तापत ठेवणार, पाकिस्तान जम्मू-काश्मीरची सीमा अशांत ठेवणार व बांगलादेश पूर्वोत्तर भारताला लागून असणारी सीमा अशांत ठेवणार असे चित्र तयार होत आहे. येणाऱ्या काळात बांगलादेश भारताच्या विरोधात आणखी काही निर्णय घेण्याची शक्यता आहे. पाकिस्तानची आयएसआय व चीन हे दोन्ही देश बांगलादेशला हे करण्यास बाध्य करतील. चीनच्या कचाट्यातून बांगलादेशची सुटका होण्याची शक्यता जवळपास नसल्याचे म्हटले जाते.

**मोठे आव्हान** : बांगलादेशचे हे धोरण भारतासाठी नवे आव्हान निर्माण करणारे आहे. भारतासाठी आजवर बांगलादेशची सीमा अतिशय सुरक्षित मानली जात होती. आता ती राहणार नाही. पाकिस्तान आपल्या दहशतवाद्यांना भारतात घुसविण्यासाठी बांगलादेश सीमेचा वापर करू शकतो. भारत-पाकिस्तान ताज्या चकमकीत बांगलादेशने आपली हवाई सीमा भारतासाठी बंद केल्याचे वृत्त आले होते. बांगलादेशने त्याचा ना इन्कार केला ना त्यास दुजोरा दिला. दरम्यान, पाकिस्तानने बांगलादेशशी आपले संबंध पुन्हा एकदा बळकट करण्याचा निर्णय घेतला असून, उच्चस्तरीय आर्थिक व लष्करी शिष्टमंडळे बांगलादेशात पाठविणे सुरू केले आहे. बांगलादेश म्हणजे पूर्वीचा पूर्व पाकिस्तान आणि सध्याचा पाकिस्तान हा पश्चिम पाकिस्तान होता. अशा या पूर्व व पश्चिम पाकिस्तानात कधीच सहकार्याचे संबंध राहिले नव्हते. पश्चिम पाकिस्तान विरुद्ध पूर्व पाकिस्तान असे शीतयुद्ध कायम सुरू होते. याची परिणती पाकिस्तानच्या विभाजनात झाली. आता हे दोन देश चीनच्या आशीर्वादाने भारताच्या विरोधात परस्परांच्या जवळ येत आहेत. झपाट्याने जवळ येत आहेत.

**पुढील लक्ष्य नेपाळ?** : भारताचा शेजारी देश नेपाळची भारत सीमा शांत आहे. येणाऱ्या काळात भारत-नेपाळ संबंध तणावपूर्ण करण्याचा प्रयत्न चीन करणार असल्याचे मानले जाते. भारताला आपले लष्कर जास्तीत जास्त सीमांवर तैनात करावे लागेल अशी चीनची व्यूहरचना असल्याचे सांगितले जाते. प्रथम लडाख व आता भारत पाकिस्तान चकमकीने त्याचा प्रत्यय आला आहे.

**'रॉ'ची चूक भोवली** : पाकिस्तानची डोकेदुखी कमी करण्यासाठी त्याचे दोन तुकडे करण्याचा निर्णय भारताने घेतला होता. १९७१ च्या युद्धात त्याची अंमलबजावणी इंदिरा गांधीच्या सरकारने केली. पाकिस्तानचे खच्चीकरण करीत भारतासाठी एक मित्र राष्ट्र तयार करणे या व्यूहरचनेतून बांगलादेशचा जन्म झाला. आता त्यावरच पाणी फेरले जात असल्याचे दिसते. भारताची विदेशातील गुप्तचर संस्था 'रॉ' चे हे सर्वांत मोठे अपयश होते. चीन व पाकिस्तान बांगलादेशात सत्ताबद्दल घडवून आणीत आहे. याचा साधा सुगावाही 'रॉ' ला लागला नाही असे दिसते. अन्यथा पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांना भारतात आश्रय घ्यावा लागला नसता. 'रॉ'च्या या एका अपयशामुळे भारतासाठी किती आव्हानाची स्थिती तयार होत आहे याचा अंदाज आता सर्वांना आला आहे. पाकिस्तान सोबतच, बांगलादेशही भारताशी 'गुर्मी' दाखवू लागला आहे. कारण, दोघांनाही शह देणारा देश एकच आहे चीन! जगाची एक नवी महासत्ता! ▮

## वेध

# मान्सूनची निर्मिती आणि भ्रमंती

**पुंडलिक आंबटकर**

ऋतू परिवर्तन पृथ्वीच्या सूर्यभ्रमणावर अवलंबून आहे. पृथ्वी सूर्याभोवती फिरत असल्यानेच पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळा येतो. पृथ्वी आपल्या अक्षावर २३.५ अंश झुकलेली असल्यामुळे ऋतूंमध्ये बदल होतात. उन्हाळा तापल्याशिवाय पावसाळ्याची निर्मिती होऊ शकत नाही आणि पाऊस पडल्याशिवाय हिवाळा आकार घेऊ शकत नाही. यातील एका ऋतूमध्ये बदल झाला तरी त्याचा परिणाम तीनही ऋतूंवर होतो. उन्हाळा तापतो म्हणून रासायनिक प्रक्रिया घडून येते आणि हिंद महासागरातून मोसमी वारे वाहू लागतात. या प्रक्रियेलाच पावसाळा म्हणतात. उन्हाळ्यात भूभाग आणि महासागरातील तापमान व दाबातील फरकामुळे ढगांची निर्मिती होते आणि हे ढग भूभागाकडे कूच करू लागतात. यालाच मोसमी वारे अर्थातच मान्सून म्हणून ओळखले जाते. भारतीय पावसाळा केरळपासून सुरू होतो आणि पश्चिम घाटांमधून हिमालयाकडे जातो. हिंद महासागरात सूर्य विषुववृत्ताच्या अगदी वर असतो तेव्हा मान्सून वारे आकार घेतात. यावेळी समुद्राचे तापमान ३० अंशांपर्यंत तर पृथ्वीचे तापमान ४५-४६ अंशांपर्यंत गेलेले असते. त्यामुळे हिंद महासागराच्या दक्षिण भागात मान्सून आकार घेतो. या काळात देशातील भूभागाचे तापमान समुद्रसपाटीच्या तापमानापेक्षा अधिक असल्याने समुद्राकडील वारे भूभागाकडे धाव घेतात. हे वारे समुद्रात निर्माण होणारे बाष्प शोषून घेतात आणि भूभागाच्या संपर्कात आल्यावर वर जाऊन पावसाची निर्मिती करतात.

भारतातील एकूण पावसापैकी मान्सूनच्या पावसाचा वाटा ८० टक्के आहे. केरळ परिसरातून सुरू झालेला पावसाळा नंतर ईशान्येकडील राज्यांना व्यापतो. मान्सून उत्तरेकडे सरकतो आणि कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यप्रदेश ही राज्ये आपल्या कवेत घेतो. जून अखेरपर्यंत राजस्थानसह पावसाळ्याने संपूर्ण भारत व्यापलेला असतो. सप्टेंबर महिन्याचा पंधरवडा उलटल्यानंतर राजस्थानमधून पावसाळा माघार घेऊ लागतो. महासागरातून उदयास आलेला पावसाळा पुन्हा महासागराच्याच वातावरणात मिसळून जातो आणि हिवाळ्याची चाहूल लागते. आपण पृथ्वीच्या उत्तर गोलार्धात राहतो. जेव्हा आपल्याकडे हिवाळा असतो तेव्हा दक्षिण गोलार्धात तीव्र उन्हाळा असतो. भारतीय मान्सूनचे दोन प्रकार आहेत. नैर्ऋत्य आणि ईशान्य मोसमी पाऊस. नैर्ऋत्य मोसमी पाऊस जून ते सप्टेंबरदरम्यान पडतो, तर ईशान्य मोसमी पाऊस सप्टेंबर महिन्याच्या शेवटी सक्रिय होऊन ऑक्टोबरपर्यंत राहतो. अनेकदा ऑक्टोबर महिन्यात अतिवृष्टी झाल्याचे आपण पाहिलेले आहे. हा पाऊस ईशान्य मोसमी अर्थातच परतीचा पाऊस म्हणून ओळखला जातो. नैर्ऋत्य मोसमी पावसाचे ढग पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहतात. तर ईशान्य मोसमी पावसाचे ढग पूर्वेकडून पश्चिमेकडे जातात. ईशान्य मोसमी पावसात प्रचंड घनता असते. परिणामी, या काळात विजा पडून अनेकांचा जीव जातो. भारतीय मान्सूनचे केरळ हे प्रवेशद्वार आहे. समुद्रातून केरळात प्रवेश केल्यानंतर मान्सून टप्प्याटप्प्याने पुढे सरकतो. साधारणतः पावसाळ्याला केरळपासून १ जून रोजी सुरुवात होते. परंतु, यंदा मान्सून वेळेआधीच दाखल झालेला आहे. खूप वर्षांपूर्वी, १९१८ मध्ये मान्सून ११ मे रोजी केरळमध्ये आला होता. आता २०२५ मध्ये मान्सून २४ मे रोजी केरळात दाखल झाला. यापूर्वी २००१ आणि २००९ मध्येसुद्धा २३ मे रोजी केरळात मान्सून आकारास आला होता. परंतु, त्यावेळी विविध कारणांनी मान्सूनला इतर राज्यांमध्ये पोहोचण्यास उशीर झाला होता. परंतु, यंदा अल्पावधीतच मान्सून महाराष्ट्रात दाखल झाल्याचे वेधशाळेने जाहीर केले आहे. गडचिरोलीमार्गे विदर्भातही मान्सून दाखल झाल्याचे सांगण्यात येते. परंतु, याबाबत वैज्ञानिक आणि जाणकारांमध्येच मतभेद दिसतात. अकोल्याच्या एका प्रसिद्ध जाणकाराने हा पाऊस मान्सूनचा नसल्याचे म्हटले आहे. शिवाय रशियाच्या वातावरणात झालेल्या बिघाडाचा परिणाम भारतीय मान्सूनवर होण्याची शक्यता काहींनी वर्तविली आहे. परंतु, रशियातील वातावरणाचा भारतीय मान्सूनवर परिणाम होऊ शकतो का? यंदा पावसाने उन्हाळी पिकांची पार वाट लावली आहे. पश्चिम विदर्भातील फळबागा आणि तिळाचे प्रचंड नुकसान करणारा हा पाऊस पूर्व विदर्भातील धानपट्ट्यालाही नकोसा होऊन बसला आहे. अनेक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वेधशाळेने वर्तविली आहे. परंतु, आणखी काही दिवस पावसाने धीर धरावा, अशी अपेक्षा शेतकऱ्यांची आहे. १ जूननंतर मान्सूनचा प्रवास थंडावणार असल्याचेही जाणकारांचे म्हणणे आहे. २९ मेपर्यंत आपल्या अस्तित्वाची चुणूक दाखवणारा पाऊस ३० व ३१ मे रोजी मात्र काहीसा थंडावला होता. १५ जूनपर्यंत संपूर्ण विदर्भ मान्सूनच्या कवेत असेल, अशी माहिती नागपूर वेधशाळेने दिली आहे. ▮

९८८१७१६०२७

## कानोसा

# मोदींचा स्वदेशी संदेश

**अमोल पुसदकर**

यापूर्वीही देशामध्ये अनेकानेक महापुरुषांनी स्वदेशीचा संदेश दिलेला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांनी तर विदेशी कपड्यांची होळी सुद्धा केलेली होती. १९०५ मध्ये ज्या वेळेला बंगालचे विभाजन झाले त्यावेळेला इंग्रजांविरुद्धचा संताप आणि ते रद्द करण्यासाठी इंग्रजांना विवश करावे म्हणून स्वदेशीची मोहीम सुरू झाली होती. त्याचा परिणाम इतका झाला की संपूर्ण देशभर स्वदेशीचे वातावरण निर्माण झाले. धोबी लोकांनी विदेशी कपडे इस्त्री करायला नकार दिला, हलवाई लोकांनी विदेशी साखरेची मिठाई तयार करण्याला नकार दिला, लग्न लावणाऱ्या पुरोहितांनी जो नवरदेव विदेशी कपड्यांमध्ये उभा राहील त्याचे लग्न लावण्यास नकार दिला, चप्पल दुरुस्त करणाऱ्यांनी विदेशी चपला दुरुस्त न करण्याचा निर्णय घेतला. विदेशी मिठाई, विदेशी कपड्यांवर सुद्धा बहिष्कार टाकण्यात आला. संपूर्ण देश भारताच्या स्वाभिमानासाठी पेटून उठलेला होता. भारत निर्मित जाडे भरडे वस्त्र आम्ही घालू परंतु विदेशी वस्त्र वापरणार नाही असा संकल्प जनतेने केला. इंग्लंडमधील मँचेस्टर शहरातून मुंबईला त्याकाळी चाळीस हजार मँचेस्टर कापडाचे गठ्ठे पाठवले जात होते. परंतु १९०५ -१९०६ या वर्षांमध्ये केवळ ४० गठ्ठे विकले गेले. त्यामुळे मुंबईच्या व्यापाऱ्यांनी मँचेस्टरच्या व्यापाऱ्यांना व मँचेस्टरच्या व्यापाऱ्यांनी इंग्रज सरकारला हे सांगितले की आपण भारतामध्ये मूलतः व्यापार करायला आलो होतो. आज राज्य करता करता जनभावना आपल्या विरोधात गेल्यामुळे जर आपला व्यापार खंडित होणार असेल तर याचा आपण विचार केला पाहिजे. ज्या बंगालची फाळणी झालेली होती, संसदेमध्ये त्याचा कायदा पारित झाला होता अशी बंगालची फाळणी इंग्रज सरकारने रद्द केली. इतका आर्थिक बहिष्काराचा परिणाम असतो.

नुकतेच ऑपरेशन सिंदूर झाले. चीन, अझरबैजान, तुर्की या देशांनी भारतविरोधी भूमिका घेत भारताच्या सैन्य कारवाईला अनुचित ठरवले तर पाकिस्तानला त्यांनी समर्थन दिले. पाकिस्तानची पीछेहाट होत आहे हे पाहून चीनने तर पाकिस्तानला स्व-रक्षणाचा अधिकार आहे असे म्हटले व पाकिस्तान आमचा चांगला मित्र आहे अशीही पुष्टी जोडली. पाकिस्तानने जे १००० पेक्षा अधिक ड्रोन्स भारतात पाठविले होते हे सर्व किंवा अधिकांश तुर्कीमध्ये बनलेले होते किंवा चीनमध्ये बनलेले होते. जे मिसाईल्स भारतावर सोडण्यात आले, ते पण चीनमध्ये बनलेले होते. त्यावरून तुर्कस्तान व चीन हे आपले शत्रुराष्ट्र पाकिस्तानला मदत करणारे देश आहेत हे सिद्ध झाले. अझरबैजानसारखा देश ज्यामध्ये भारतीय लोक पर्यटनाला जातात, या देशाने सुद्धा पाकिस्तानची बाजू घेतली. भारतीय लोकांनी तुर्कस्तान आणि अझरबैजान या देशामध्ये फिरायला जाऊन पर्यटनाच्या रूपाने या देशांना ४७०० कोटी रुपयांची मदत केली. त्यामुळे देशवासीयांना जागृत करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरात येथील एका भाषणात स्वदेशीचा संदेश दिलेला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात की, आमच्या देशामध्ये दैनंदिन उपयोगाच्या वस्तू, तसेच आमच्या देवतांच्या मूर्ती उदाहरणार्थ गणेश, लक्ष्मी यासुद्धा विदेशातून म्हणजे चीनमधून भारतामध्ये येत आहेत आणि भारतीय लोक या मूर्ती विकत घेत आहेत. भारतीय लोकांनी आपल्या दैनंदिन वापराच्या वस्तूंमध्ये भारतीय वस्तूंना प्राधान्य देणे आवश्यक आहे. अनेक वेळा असे म्हटले जाते की भारतीय वस्तू या गुणवत्तेच्या आधारावर विदेशी वस्तूंसारख्या नसतात. परंतु आपण लक्षात घेतले पाहिजे की कुठल्याही वस्तू एकदम तयार होत नाही. एकेकाळी भारताला कापड सुद्धा विदेशातून आयात करावे लागत होते परंतु आज मात्र भारतीय कापडउद्योग हा पूर्णपणे स्वावलंबी झालेला आहे व उत्तम दर्जाचे कापड भारतामध्ये निर्माण होते. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेची स्थापना झाल्यानंतर भारताने मागील ५५ वर्षांमध्ये खूप मोठी प्रगती केली आहे. मिशन मंगलयान, मिशन चांद्रयान, मिशन आदित्य यांच्याद्वारा भारत अंतराळामध्ये आपला दबदबा निर्माण करणारा देश झालेला आहे. आज आम्ही इतर देशांचे उपग्रह अंतराळात पाठवतो. यावरून आपल्या असे लक्षात येते की, आज जरी इलेक्ट्रॉनिक्स, फार्मा अशा अनेक क्षेत्रांमध्ये आम्ही मागे असलो तरीसुद्धा जोपर्यंत आम्ही स्वदेशीची भावना आपल्या मनामध्ये धारण करणार नाही तोपर्यंत कुठल्याही क्षेत्रांमध्ये संशोधन, विकास होऊ शकणार नाही.

पूर्वी मोबाईल बनविणाऱ्या एक दोनच कंपन्या भारतीय होत्या. उर्वरित सगळे मोबाईल चीनमधून आयात केले जायचे. परंतु मेक इन इंडिया या योजनेअंतर्गत आता सॅमसंग, ॲपल आणि जगातील मातब्बर कंपन्यांचे मोबाईल सुद्धा भारतातच बनू लागले आहेत. यातूनच प्रेरणा घेऊन भारतीय बनावटीचे मोबाईल सुद्धा येणाऱ्या काळात भारत बनवू शकेल. अनेक वाहनांमध्ये लागणाऱ्या सेमीकंडक्टर चिप आम्ही चीनमधून आयात करीत होतो. परंतु कोरोनाच्या काळामध्ये चीनने निर्यात थांबल्यामुळे आमच्या अनेक उद्योगांवर खूप मोठा परिणाम झाला. यातून धडा घेत आम्ही सेमीकंडक्टर चिप बनविणे भारतात सुरू केले. म्हणजे गरज ही शोधाची जननी आहे हे खरेच आहे. परंतु भारतीयांची गरज आणि भारतीयांची अपरिहार्यता या दोन्ही गोष्टींचे उत्तर स्वदेशीच असायला पाहिजे. पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या काळापासून सुद्धा आम्ही "चाहत से देसी और मजबूरी में विदेशी" हा मंत्र दिलेला आहे. दीनदयाल उपाध्याय सुद्धा त्या काळामध्ये म्हणायचे की, आम्ही स्वदेशी वस्तूंचा उपयोग केलाच पाहिजे, परंतु देशाच्या संरक्षणासाठी जर आम्हाला विदेशी वस्तू, विदेशी शस्त्र आणि विदेशी संरक्षण सामग्री मागवावी लागली तरी ते आमच्या देशाच्या संरक्षणासाठी असल्यामुळे त्यात काही गैर नाही. ते आम्ही केलेच पाहिजे. चीनशी आमचा सगळ्यात मोठा व्यापार चालतो. आम्ही चीनला १४ अब्ज डॉलर्सच्या वस्तू निर्यात करतो तर जवळपास ११४ अब्ज डॉलर्सच्या वस्तू आयात करतो. यावरून आपल्या लक्षात येईल की आपला व्यापार घाटा हा शंभर अब्ज डॉलर्सपर्यंत जाऊन पोहोचलेला आहे. तुर्कस्तानकडून आम्ही ३.२८ अब्ज डॉलर्सच्या वस्तूंची आयात केलेली आहे तर अझरबैजानकडून आम्ही ९५५ दशलक्ष डॉलर्सच्या वस्तू आयात केलेल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने पेट्रोलियम पदार्थ आहेत. ज्या वेळेला जगाने रशियावर बंदी टाकलेली होती व कोणीही रशियाकडून तेल विकत घेऊ नये असे म्हटले होते त्याही वेळेला भारताने रशियाकडून तेल विकत घेतलेले होते. भारतीय जनतेने आपल्या दैनंदिन जीवनातल्या आवश्यक वस्तू जर भारतीय कंपन्यांच्या विकत घेतल्या तर भारताच्या बाहेर जाणारा पैसा हा वाचेल व त्या पैशाचा भारतामध्येच अनेक सुधारणांसाठी उपयोग होऊ शकेल. धर्म बघून जर तुर्कस्तान, अझरबैजान पाकिस्तानला समर्थन देऊ शकतात तर आपण देश बघून वस्तू खरेदी करायला काय हरकत आहे? ▮

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### समाजाला कलंक राजकारणी सासर?

सध्या वैष्णवी हगवणे मृत्युप्रकरण गाजत आहे. कोट्यवधींचे सोने, साड्या, भेटवस्तू, चारचाकी गाडी आणि बरेच काही हुंडा स्वरूपात मिळाल्यावरही वैष्णवीचे लोभापायी हाल करणारे सासरचे लोक. आजही शिकलेल्या मुलींचा हुंडाबळी दिला जात असेल तर सर्व समाजाला विचार करावा लागेल. हुंडा घेणाऱ्या सासरच्यांना कठोर शिक्षा लवकरात लवकर देऊन पुढे कोणी सुनेसोबत अशा प्रकारे वागून तिचा बळी घेणार नाही याचा बंदोबस्त करावा. राजकारणी घरात, जिथे पैशांची मुळात कुठलीही कमी नसताना पैशांसाठी हपापलेले सासरचे लोक समाजाची खरंच सेवा करू शकतील का? अशा राजकारण्यांना निवडून देणारी जनता स्वतःच्या न्यायासाठी दाद मागू शकेल का? सासरी गेलेल्या मुलींनी सासरच्यांचा मान ठेवावा ही आपली शिकवण पण सोबतच स्त्रीचे 'स्व'त्व जपणे तेवढेच महत्त्वाचे. आपल्यावर अन्याय करणाऱ्या लोकांवर कायदेशीर कारवाई करणे महत्त्वाचे नाही का? दुर्गादेवी, राणी लक्ष्मीबाई यांचा आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक स्त्रीने अन्यायाचा प्रतिकार करायलाच हवा. माहेरच्यांनी देखील मानाचा, प्रतिष्ठेचा विचार न करता सासुरवाशीण मुलीला भक्कम पाठिंबा द्यायला हवा. मुलींनीदेखील शोभेची बाहुली न बनता कणखर होऊन आयुष्याची लढाई लढायला हवी. आजची स्त्री वीरांगना आहे याचा प्रत्यय समाजाला करून द्यायला हवा असे वाटते.

**डॉ. भारती अनिल हेडाऊ**/९४२१७७३९९९

●● ●●.

### टायअप प्रणालीमुळे विद्यार्थी संभ्रमात

इयत्ता दहावीमध्ये गुणवत्तेने पास होणारा विद्यार्थी वर्ग बारावीमध्ये १५ ते २० टक्के गुणांनी खाली घसरतो. याला सर्वस्वी जबाबदार आजचे शिकवणी वर्ग आहेत. आज शिकवणी वर्गांच्या संस्थाचालकांनी चांगलेच पाय पसरले आहेत व कनिष्ठ महाविद्यालयांशी संधी (टायअप) करून पालक व विद्यार्थी यातील संभ्रम वाढवला आहे. आपले साम्राज्य वाढविण्यासाठी पहिलेच्या काळातील राजे महाराजे जसे इतर राज्यांवर आक्रमण करायचे अगदी तसेच त्याप्रमाणे काही महाविद्यालयांनी आपली विद्यार्थिसंख्या वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांना वेगवेगळी आमिषे दाखवून आपल्याकडे ओढण्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे. ज्या शाळा किंवा महाविद्यालये योग्य मार्गाचा अवलंब करून संस्कारक्षम वातावरणात विद्यार्थी घडवतात, शंभर टक्के निकाल देतात, सुजाण आणि आदर्श विद्यार्थी घडविण्याचे काम करतात अशी विद्यालये दुर्लक्षित होत आहेत. दुसरीकडे जे प्रयोगशाळा व इतर शैक्षणिक साधनांचा वापर न करता, विद्यार्थ्यांचे वर्ग न घेता अयोग्य पद्धतीचा वापर करत आहेत, त्यांचा समाजावर प्रभाव वाढत चाललेला आहे. यामुळे विद्यार्थी आपली दिशा चुकत आहेत. शासनाने वेळीच पायबंद घातला नाही तर याचा अतिशय वाईट परिणाम बारावीत गेल्यावर विद्यार्थ्यांच्या भविष्यावर होईल. यामुळे विद्यार्थ्यांचे चुकीचे मूल्यमापन होत आहे. हे अतिशय घातक आहे. शासनाने ताबडतोब यासंबंधी कडक धोरण स्वीकारावे. एकाच वर्षी बोर्ड परीक्षा व स्पर्धा परीक्षा द्यावी लागत असल्यामुळे विद्यार्थी सोपा मार्ग निवडतो. परंतु त्याचे बोर्ड परीक्षेचे गुण किंवा स्पर्धा परीक्षेचे अपयश याची जबाबदारी खाजगी शिकवणीवाले घेण्यास तयार नाहीत.

**रेणुका खळतकर**/नागपूर

●● ●●.

## वाचक पत्रे

### अभिनंदन मोदी सरकार व भारतीय वायुसेनेचे

२२ एप्रिल २०२५रोजी पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यामुळे संपूर्ण देश शोकसागरात बुडाला. सोबतच संपूर्ण देशवासीयांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली. २४ तारखेपासून मोदींनी तिन्ही सैन्यदलांसोबत बैठकींचे सत्र सुरू केले. त्या कालावधीत मोदींनी एका भरसभेत पाकिस्तानला थेट इशारा दिला. त्यानंतर ७ मे रोजी मध्यरात्री २ वाजता भारतीय वायुसेनेने पाकमध्ये घुसून दहशतवाद्यांची ठिकाणे उद्ध्वस्त केली. आपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय वायुसेनेने गनिमी काव्याचा वापर केला व मोहीम फत्ते केली. ऑपरेशन सिंदूरने संपूर्ण जगाला नारीशक्तीचे दर्शन घडवले. या संपूर्ण




मोहिमेमध्ये तिन्ही दलांची भूमिका महत्त्वपूर्ण होती. तरीसुद्धा स्त्रीशक्तीची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली आहे. विंग कमांडर व्योमिका सिंह व कर्नल सोफिया कुरेशी यांची भूमिका संपूर्ण भारतासाठी फारच हृदयस्पर्शी व अभिमानास्पद ठरली आहे. या दोघींच्या माध्यमातून दोन दैवी स्त्रीचे दर्शन झाले ते म्हणजे स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ व स्वराज्य सौदामिनी ताराराणी. तिन्ही सैन्य दलांना मानाचा मुजरा. ▮

**अक्षय उपगडे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# माजलगाव-तेलगाव रोडवर भीषण अपघात टेम्पोने रिक्षाला उडविल्याने पाच ठार



## मयतात पती-पत्नीचा समावेश

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ जून**

खामगाव -पंढरपूर पालखी महामार्गावरील तेलगाव-माजलगाव रस्त्यावर नित्रुड जवळ रविवारी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास टेम्पो व रिक्षा अपघातात चार जागीच ठार तर एकाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली. जखमींना माजलगाव येथील रुग्णालयात उपचारार्थ पाठविण्यात आले. मयतात पती पत्नीचा समावेश आहे. हाअपघात एवढा भिषण होता की, आयशरने टोला जवळपास ५० ते ६० फुट अंतरापर्यंत फरफटत नेले.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, माजलगाव तालुक्यातील भाटवडगाव येथील काही लोक ऑटोने (क्र.एम एच.२३ एन ०२७३) रविवारी अकरा ते साडे अकरा वाजेदरम्यान तेलगावकडुन माजलगावकडे जात असताना ऑटो नित्रुड जवळील एका पेट्रोल पंपा समोर आला असता समोरून येणाऱ्या आयशर ने (क्र.एम.एच.२३ एम. ९२५५) ऑटो रिक्षाला जबर धडक दिली. अपघात एवढा भीषण होता की आयशरने धडक देताच ऑटो रिक्षा जवळपास ५० ते ६० दूर अंतरापर्यंत फरफटत गेला. अपघातात ऑटो मधील चार जण जागीच ठार झाले तर उपचारादरम्यान एकाचा मृत्यू झाला .मयतात एका महिलेचा समावेश आहे. तर एक गंभीर जखमी झाले. रूग्ण वाहिकेने माजलगाव येथील रूग्णालयात उपचारार्थ पाठविण्यात आले. यात फारूक चांद सय्यद, त्यांच्या पत्नी सय्यद शबाना फारूक व शेख नोहिद एजाज व फैजान हे ठार झाल्याचे समजते. मयताच्या जवळ असलेल्या आधारकार्डवरून त्यांची ओळख पटली. अपघातातील इतर मयत व जखमींचे नावे उपलब्ध होऊ शकले नाहीत. आयशर चालक घटनास्थळावरून पसार झाला. अपघाताची माहिती मिळतात दिद्रूड पोलीस ठाण्या पोलीस कर्मचारी महेश सादुख, खलील मोमीन, सचिन गायकवाड, कानदास बनसोडे, चामनर आदि तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

# शिवसैनिकांनो बॅनर नको, गरजवंतांना मदतीचा हात हीच माझ्यासाठी खरी शुभेच्छा- अनिलदादा जगताप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ जून**



शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांचा वाढदिवस येत्या बुधवार, ४ जून रोजी असून प्रत्येक वर्षी हा दिवस जिल्हाभरातील शिवसैनिकांसाठी एक उत्सव असतो. निष्ठावंत शिवसैनिकांकडून अनिलदादांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात, शहरभर बॅनर्स लावले जातात आणि हा दिवस जल्लोषात साजरा होतो. मात्र यंदा अनिलदादांनी आपल्या शिवसैनिकांना एक भावनिक आणि विचारप्रवृत्त करणारे आवाहन केलं आहे. त्यांनी आपल्या अधिकृत फेसबुक पेजवरून शिवसैनिकांना सांगितलं आहे की, माझा वाढदिवस बॅनरमुक्त करा. हे बॅनर लावण्यासाठी लागणारा खर्च लाखोंच्या घरात जातो. त्याऐवजी हा पैसा गरजूंवर खर्च करा. अनिलदादांचे हे आवाहन केवळ एक विनंती नसून समाजासाठी आपली जबाबदारी ओळखणाऱ्या नेत्याचे भावनिक मनोगत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु आहेत. अशा वेळी रस्त्यांवर भरपावसात भाजी विकणारे, कामावर जाताना मजूर, यांच्यासाठी रेनकोट किंवा छत्र्यांचे वाटप हा एक छोटा प्रयत्न असला, तरी त्यांना दिलासा देणारा हात ठरेल. माझा खरा वाढदिवस तेव्हाच साजरा होईल, जेव्हा गरिबांच्या चेहऱ्यावर तुमच्या मदतीमुळे हास्य उमटेल, असं सांगत अनिलदादांनी शिवसैनिकांना एक नवा विचार देत वाढदिवस गरजावंतांना मदतीचा हात द्या असे आवाहन केले आहे.

सामाजिक उपक्रमांनी होणार अभिष्टचिंतन!

अनिलदादांच्या प्रेरणादायी आवाहनाला प्रतिसाद देत, जिल्हाभरातील शिवसैनिक अनिलदादांच्या वाढदिवसावर होणाऱ्या विविध खर्चातून सामाजिक उपक्रम राबवणार आहेत. अनेक ठिकाणी रेनकोट वाटप, अन्नदान, आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिर तसेच विविध समजपयोगी उपक्रमांचे आयोजन शिवसैनिक करणार आहेत.

# जागतिक तंबाखू विरोधी सप्ताह' आदित्य डेंटल कॉलेजमध्ये उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ जून**

तरुण पिढीला तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. जागतिक तंबाखू विरोधी सप्ताह या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी समाजात सकारात्मक संदेश पोहोचवला आहे. या महाविद्यालयात कम्युनिटी डेंटिस्ट्री विभाग समाजातील दंत आरोग्य सुधारण्यासाठी विविध आरोग्य तपासणी तसेच जनजागृती शिबिरे आयोजित करत आहे. या उपक्रमांतर्गत, तंबाखूविरोधी जनजागृती आणि सल्ला देण्याची सेवा देखील दिली जाते. या सेवांसाठी कॉलेजकडे सुसज्ञ मोबाइल डेंटल व्हॅन आणि पोर्टेबल डेंटल चेअर उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त जनजागृती करून तरूण पिढीला तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे असे आवाहन कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. अदिती सुभाषचंद्र सारडा यांनी केले.

आदित्य शिक्षण संस्थेत ३१ मे रोजी जागतिक तंबाखू निषेध दिनानिमित्त आदित्य डेंटल कॉलेज, बीड येथे संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली 'तंबाखू विरोधी सप्ताह' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा बोलत होत्या.महाविद्यालयाच्या वतीने २७ मे ते ५ जून दरम्यान विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

# जनहिताच्या मागण्याबाबत सरकारची दुटप्पी भूमिका-कॉ.ॲड.अजय बुरांडे

## सिरसाळ्यात किसान सभा व शेत मजूर युनियनची निदर्शने

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२ जून**

पीक विमा, कर्ज माफी व गायरान जमिनी याबाबत सरकारची दुटप्पीपणा उघड उघड जनतेसमोर येत असून एकीकडे गायरान जमिनी कसनाऱ्या भूमीहीन शेत मजुरांना देण्याची घोषणा करत असतानाच वर्षानुवर्षे गायरान जमिनी कसून आपली उपजीविका भागविण्या-या शेतमजूराच्या जमिनी खाजगी सौर वीज निर्मिती कंपनीच्या घशात घालण्यासाठी शेत मजुरांना रस्त्यावर आणण्याचे काम सत्ताधारी करत आहेत. हमी भाव, कर्ज माफी, विविध अनुदान याबाबत सगळी पोकळ आश्वासन सरकारकडून देण्यात येत असून प्रत्यक्षात मात्र शून्य कार्यवाही होत असल्याने सर्व सामान्यांच्या जिवन मरणाचा प्रश्न बिकट बनत जात आहे.जनसामान्यांचे प्रश्न तात्काळ दूर करून त्यांना दिलासा द्यावा यासह इतर मागण्यांसाठी तालुक्यातील सिरसाळा या ठिकाणी करण्यात आलेल्या निदर्शने प्रसंगी कॉ. एड.अजय बुरांडे यांनी सरकारच्या भूमिकेवर संताप व्यक्त केला.



पिकविम्यापासून सर्व वंचित शेतकऱ्यांना ताबडतोब पिक विमा वितरित करण्यात यावा, सर्व शेतकऱ्यांचे सरसकट संपूर्ण पीककर्ज माफ करावे, गायरान जमिनीतील राहती घरे नावावर करणे व कसणाऱ्या जमिनी धारकांच्या नावे करण्या बाबत व गायरान जमिनीतील राहती घरे सौर ऊर्जा निर्मितीसाठी खाजगी कंपनीला देण्यासाठी उठवून त्या नागरीकांना भूमिहीन व बेघर करण्याचा घाट घातला जात आहे तो त्वरित बंद करावा व उलटपक्षी त्या गायरान जमिनीवर लोकांची घरे व जमिनी त्यांच्या नावावर कराव्यात या मागण्या घेत अखिल भारतीय किसान सभेकडून तालुक्यातील सिरसाळा येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी जाहीर निदर्शने करण्यात आली.या निदर्शने प्रसंगी किसान सभेचे जिल्हा सचिव कॉ. मुरलीधर नागरगोजे, कॉ. भगवान बडे, कॉ. पप्पू देशमुख, कॉ.मुक्तेश्वर कडभाने, कॉ. रुस्तुम माने,कॉ. मदन वाघमारे, कॉ प्रकाश उजगरे, कॉ.गंगाधर पोटभरे, कॉ.विष्णू देशमुख,कॉ. बळीराम देशमुख यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सिंगल युज प्लास्टिकचा भस्मासूर रोखायलाच हवा अन्यथा परिस्थिती गंभीर ; ना. पंकजाताई मुंडे यांची परळीत जनजागृती मोहीम

वैद्यनाथ मंदिरात कापडी पिशवी वेडिंग मशीनचे उदघाटन; आनंदधाम येथे वृक्षारोपण तर मंदिर परिसरात स्वच्छता मोहिम नागरिकांनी जास्तीत जास्त कापडी पिशव्यांचा वापर करण्याचे केले आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२ जून**

पर्यावरण संरक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यामुळेच पर्यावरणाला घातक असणाऱ्या एकल प्लास्टिक वापराचा भस्मासूर आपल्याला रोखायलाच हवा, यासाठी कापडी पिशव्यांचा अधिकाधिक उपयोग करावा त्याचबरोबर आपला परिसर स्वच्छ कसा राहील यासाठी कचरामुक्त परिसरावरही लक्ष केंद्रित करून पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक अशा वृक्षारोपणाकडेही प्रत्येकाने लक्ष द्यावे. एवढेच नाही तर एक झाड आई-वडिलांसाठी तर एक झाड हे आपल्या सृष्टीमातेसाठी लावावे आणि त्याचे संवर्धन करावे असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे आज केले.



शहरातील आनंदधाम येथे सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने वृक्षारोपण, पर्यावरण विभाग व गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने वैद्यनाथ मंदिरात 'नो प्लास्टिक' उपक्रमा अंतर्गत कापडी पिशवी मशीनचे उदघाटन पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज करण्यात आले, यावेळी आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. वैद्यनाथ देवल कमिटीचे राजेश देशमुख, भाजपचे ज्येष्ठ नेते दत्तापा इटके, शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, उप जिल्हाधिकारी अरविंद लाठकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नगरपरिषद मुख्याधिकारी कांबळे, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कुरमूडे आदी उपस्थित होते.

मंदिर परिसरात नगरपरिषदेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता मोहिमेचा शुभारंभही पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक वृक्ष माॅ के नाम' हा उपक्रम जाहीर केला आहे. यामध्ये एक आपली आई जीने आपल्याला जन्म दिला तिच्यासाठी एक वृक्ष व दुसरी आपली आई म्हणजे ही सृष्टी तिच्या संवर्धनासाठी एक वृक्ष लावला पाहिजे. त्याचे संवर्धन केले पाहिजे. यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत. वृक्षारोपणाचे कार्यक्रम केवळ राजकीय स्वरूपात करू नका. फोटो पुरते करू नका. तर ते वृक्ष जगवण्यासाठी सुद्धा प्रयत्न करा असे आवाहन पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केले.

प्लास्टिकमुक्तीचा दृढ संकल्प करा आणि कचरामुक्तीची कास धरा! सध्या पर्यावरण विभागाच्या वतीने अधिकाधिक प्लास्टिक मुक्तीवर भर दिला जात आहे. या दृष्टीने सर्व ते प्रयत्न केले जात असुन प्रत्येक नागरिकांनी या मोहिमेत सहभाग नोंदवला पाहिजे. यापुढे एकल प्लास्टिक वापरावर बंधने आणून अधिकाधिक कापडी पिशव्यांचा वापर करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील मंदिरांमध्ये ही जाणीव जागृती निर्माण करण्याचा आपला प्रयत्न असुन सर्व देवालयांशी व देवस्थानांशी बोलून याबाबत आपण पुढचे पाऊल टाकणार आहोत. नागरिकांनी अधिकाधिक कापडी पिशव्यांचा वापर करावा त्यासाठी घरातील पिशवी आणावी किंवा आपण ठिकठिकाणी कापडी पिशव्यांचे मशीन बसवणार आहोत याचा अधिकाधिक वापर करावा असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले.

# स्व.आर.टी.जिजा देशमुख यांच्या कुटुंबीयांचे धनंजय मुंडे यांनी केले सांत्वन

जिजाभाऊंचे अकाली निधन ही कधीही न भरून निघणारी हानी, धनंजय मुंडे भावूक

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२ जून**

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आज माजी आमदार तथा भाजपचे नेते स्वर्गीय आर. टी. जिजा देशमुख यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या स्मृतिस आदरांजली अर्पण करत देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन केले.



स्व. आर. टी. देशमुख यांचे एका कार अपघातात लातूर जिल्ह्यातून परतत असताना दुर्दैवी निधन झाले होते. मात्र त्यावेळी धनंजय मुंडे हे विपश्यना केंद्रात असल्याने अंत्यविधिस उपस्थित नव्हते.

धनंजय मुंडे यांनी देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली तेव्हा ते चांगलेच भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. आर. टी. देशमुख हे स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब तसेच स्व. पंडित अण्णा मुंडे यांच्या सोबत अगदी तळागाळात काम केलेले एक सच्चे सहकारी म्हणून सुपरिचित होते. त्यांच्या आठवणींना उजाळा देताना मुंडेसह देशमुख कुटुंबीय सुध्दा भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. जीजांचे अकाली निधन ही देशमुख कुटुंबाइतकीच मुंडे कुटुंबाची सुद्धा हानी असून आता तिहाने कधीही भरून निघणार नाही अशा शब्दात धनंजय मुंडे यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. यावेळी आरटीजीसांचे ज्येष्ठ बंधू एच. टी. देशमुख एम.टी देशमुख, जे. टी. देशमुख, पुत्र रोहित देशमुख, राहुल देशमुख, अभिजित देशमुख यांसह देशमुख कुटुंबीय तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, माणिकभाऊ फड, रामेश्वर मुंडे यांसह आदी उपस्थित होते.


# लोकनेते मुंडे साहेबांच्या अभिवादनासाठी आज गोपीनाथगडावर उसळणार अलोट गर्दी

रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी, पशूसंवर्धन कॅम्प, वृक्ष रोपांचे वाटप यासह विविध उपक्रमांचे आयोजन

रामायणाचार्य ढोक महाराजांचे सुश्राव्य कीर्तन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२ जून**

आपल्या लाडक्या लोकनेत्यास अभिवादन करण्यासाठी उद्या ३ जून रोजी गोपीनाथ गडावर राज्यभरातील कार्यकर्त्यांची मोठी गर्दी उसळणार आहे.गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या स्मृती दिनानिमित्त ३ जून रोजी विविध लोकोपयोगी उपक्रम राबवण्यात येत असून ह.भ.प. रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचे सुश्राव्य कीर्तनाचा सर्वांनी मोठया संख्येने लाभ घ्यावा असं आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.



गोपीनाथगड येथे स्मृतीदिनाची जय्यत तयारी झाली आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यावर अफाट प्रेम करणारे राज्यभरातील असंख्य मुंडेप्रेमी यादिवशी गोपीनाथगड येथे नतमस्तक होऊन आपल्या लाडक्या नेत्याला अभिवादन करणार आहेत.राज्याच्या पर्यावरण आणि पशूसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांच्यासह मुंडे कुटुंबीय आणि राज्यभरातून असंख्य मान्यवर स्मृती दिनानिमित्त गोपीनाथगड येथे उपस्थित राहणार आहेत. यावेळी गडावर रक्तदान शिबीर, वाहन चालकांची आरोग्य तपासणी, पशूसंवर्धन कॅम्प, जनावरांना औषधांचे वाटप, पर्यावरण संवर्धनासाठी विविध वृक्षांच्या रोपांचे वाटप असे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

ढोक महाराजांचे सुश्राव्य कीर्तन

सामाजिक उपक्रमा बरोबरच उद्या दुपारी १२ ते २ वा. यावेळेत प्रसिद्ध कीर्तनकार रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक यांचे सुश्राव्य कीर्तन आणि त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गडावर येणाऱ्या मुंडे भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची आणि महाप्रसादाची व्यवस्था देखील करण्यात आली आहे.

# मतदारसंघतील रस्त्यांसह विविध विषयी आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली बैठक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ जून**

बीड मतदारसंघातील रस्ते तसेच विविध विषयांच्या संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी आढावा बैठक घेतली. या बैठकीत नगर रोडवरील डिव्हायडर व रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करणे, राजुरी ते खरवंडी रस्त्यावरील पुलाचे रखडलेले काम, लिंबागणेश-मांजरसुंबा रस्त्यावरील जाधव वस्तीजवळ साठत असलेले पाणी, बिंदुसरा नदीवरील पूल कम बंधार्याचे संथगतीने होत असलेले काम, बीड शहरातील बार्शी रोडवर असलेला राष्ट्रवादी भवन समोरील मोठा खड्डा दुरुस्त करणे तसेच नगरपरिषदेकडून शहरात सुरू असलेल्या स्वच्छता काम व पाणीपुरवठा या विविध विषयांचा आ.संदीप क्षीरसागर यांनी आढावा घेतला.



मतदारसंघातील बीड शहर आणि ग्रामीण भागातील रस्ते, पूल आणि विविध त्यासंबंधित विविध विषय तसेच शहरातील पाणीपुरवठा आणि स्वच्छता यांच्या संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२) रोजी बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. या बैठकीत नुकत्याच नवीन झालेल्या नगर रोडवरील दुभाजकांवर आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वृक्षारोपण करणे, नवगण राजूरी येथे खरवंडी ते राजूरी रस्त्यावरील पूलाचे रखडलेले काम, लिंबागणेश ते मांजरसुंबा रस्त्यावर जाधववस्ती जवळ पाणी साठते यावर मार्ग काढणे, बीड शहरात बिंदुसरा नदीवर बंधारा कम पुलाचे काम संथगतीने सुरू आहे या कामाची गती वाढवणे, बार्शी रोडवरील राष्ट्रवादी भवन समोर पडलेला मोठा खड्डा दुरूस्त करणे तसेच बीड शहरात सुरू असलेल्या स्वच्छता काम आणि पाणी पुरवठ्याच्या कामांचा आ.संदीप क्षीरसागर यांनी आढावा घेऊन संबंधितांना योग्य त्या सूचना दिल्या. यावेळी माजी आ.सय्यद सलीम तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

नगर रोडवर रस्ता क्रॉंसीगसाठी जिल्हाधिकार्यांच्या दालनात बैठक

नगर रोडवरील जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा न्यायालयाकडे जाण्यासाठी रस्ता क्रॉसिंग असणे नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. याबाबत गेल्या अनेक दिवसांपासून सर्व स्तरांतून मागणी होत आहे. यासंदर्भात आ.संदीप क्षीरसागर सातत्याने पाठपुरावा करत आहेत. काही दिवसांपूर्वीच आ.क्षीरसागर यांनी जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली होती. त्यानंतर आता मा.जिल्हाधिकारी यांच्या दालनात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच संबंधित अधिकारी यांच्यासमवेत बैठक घेऊन नागरिकांच्या सोयीसाठी तातडीने नगर रोडवर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा न्यायालयासमोर रस्ता क्रॉसिंग करण्याची आग्रही मागणी आ.क्षीरसागर यांनी केली.

### टी सी हरवला आहे

नामे सुनील अंकुश जगताप १२ वी विज्ञान पास चा टी. सी. माजलगाव तालुक्यतील सावरगाव बस स्थानक येथून हरवला आहे. कृपया सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्क
मोबाईल क्रं.९२८४४०७९४४

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## मंत्र्यांच्या दौऱ्यात गैरहजेरी

# तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांना कारणे दाखवा नोटीस

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि.०२ जून -**



राज्य सरकारच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांचा आज दि. २ जून रोजी नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील इस्लापूर येथे अधिकृत दौरा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आयोजित कार्यक्रमास संबंधित अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे अपेक्षित होते. मात्र, किनवटच्या तहसीलदार शारदा चौंडेकर या दौऱ्यावर उपस्थित न राहिल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जारी केलेल्या नोटीसीनुसार, माननीय मंत्री झिरवाळ यांच्या उपस्थितीत किनवट येथील इस्लापूर येथे अस्थायी हॉटस्पॉटवर भेट, तसेच विविध योजनांच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये तालुक्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती अनिवार्य होती. तहसीलदार शारदा चौंडेकर या या दौऱ्याच्या वेळेस अनुपस्थित राहिल्या. त्यांच्या अनुपस्थितीमुळे प्रशासनाच्या कामकाजावर आणि नियोजनावर प्रतिकूल परिणाम झाला.

जिल्हाधिकाऱ्यांनी नोटीसीमध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या तरतुदींनुसार शिस्तभंगात्मक कारवाईस पात्र ठरते. यामुळे त्यांनी याबाबतची लेखी स्पष्टीकरण २ दिवसांच्या आत सादर करावे, अन्यथा ही कृती शिस्तभंग मानून शिस्तभंगाचे योग्य प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर केले जातील, असेही नोटीसीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकारामुळे प्रशासनात खळबळ उडाली असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आता अशा गोष्टींकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे मतही व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### मराठवाडास्तरीय डिजिटल मीडियापुरस्कार सोहळ्यात पत्रकारांचा सन्मान

**मुदखेड**-नांदेड येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने मराठवाडास्तरीय डिजिटल मीडिया पदग्रहण सोहळा २०२५ उत्कृष्ट पत्रकार संघ म्हणून मुदखेडच्या पत्रकारांचा सन्मान करण्यात आला आहे. नांदेड जिल्ह्यात आपल्या तालुक्यातील पत्रकार संघाची एकजूट व कार्यतत्परता प्रेरणादायी म्हणून डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे व व दैनिक प्रजावाणीचे संपादक गोवर्धन बियाणी यांच्या हस्ते उत्कृष्ट पत्रकार संघ सन्मान म्हणून मुदखेड पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष ईश्वर पिन्नलवार, ज्येष्ठ पत्रकार मनोज कमटे, शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष अतिक अहमद, डिजिटल मीडियाचे अब्दुल रजाक यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई राज्य निवड समितीचे अध्यक्ष संपादक रुपेश पाडमुख, डिजिटल मीडियाचे मराठवाडा अध्यक्ष धनंजय सोळंके, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अभय कुमार दांडगे यांच्या संकल्पनातून उत्कृष्ट पत्रकार संघ सन्मान व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान कार्यक्रम येथील हॉटेल विसावा या ठिकाणी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी जिल्ह्यातील अनेक पत्रकार व गुणवंत विद्यार्थी तसेच पालक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुदखेड शहरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी



**मुदखेड** -पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती मुदखेड शहरात दि. ३१ मे रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.धनगर समाज व विविध पक्षातील पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते यांच्या वतीने अहिल्यादेवी होळकर यांच्या तैलचित्रास प्रतिमेला पुष्हार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. पहिली स्त्री ज्यांनी सती प्रथेला बगल दिली स्त्रियांची सेना बनवून नारी शक्तीचा परिचय जगाला करून दिला, एवढेच नाही तर त्यांनी त्या काळामध्ये पर्यावरण संतुलन राखण्यासाठी लाखो वटवृक्षाची तसेच सदाबहार वृक्षांची भारतातील मुख्य रस्त्यावर लागवड केली देशभरात प्रमुख नद्यांवर घाट बांधणे,नवीन तळे आणि पाणपोया निर्माण केल्या,मोगल साम्राज्याचा काळात बारा आद्य ज्योतिर्लिंग सह भारतातील प्रमुख मंदिराचे जिर्णोद्धार.भारतीय राष्ट्रीय प्रतीकांची पुनर्स्थापना करून अतुलनीय उपक्रमांची मुहूर्तमेढ भारतवर्षात रोवली, या जयंती उत्सवात अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांना मान्यवरांनी उजाळा दिला. यावेळी भाजपा जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड,पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, माजी नगराध्यक्ष राजबहादुर कोत्तावार, माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मणराव देवदे,भाजपा शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण,कॉंग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे,माजी नगरसेवक माधव कदम,गंगाधर डांगे,करीम खाँ साब, उमाकांत घोंगडे,गिरिष कोत्तावार,चांदू बोकेफोड, प्रकाश बल्फेवाड,मुन्ना चौधरी,राजू बारतोंडे,नितीन गोडसे,शिवसेना शहरप्रमुख (उबाठा) सचिन चंद्रे,सुरेश शेटे,शिवाजी बिस्मिल्ले,मारुती गुंठे,कानोबा बिस्मिल्ले,गणेश वडे,गजनान कमळे,अमोल अबादार,गजानन संबोड, गोविंद गुड्डमवार,बाळू संबोड,प्रभाकर पांचाळ, शिवा तोटेवाड, मारुती फुले,गंगाधर फुले,रमेश फुले,गिरीष कमळे,रवि भेंडे धनगर समाज बांधव व विविध पक्षातील पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते धनगर समाजातील युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस किनवट तालुका आढावा बैठक उत्साहात

**किनवट** -राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस नांदेड जिल्ह्याचे नवनियुक्त अध्यक्ष स्वप्निल भाऊ इंगळे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत किनवट तालुक्यात राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसची आढावा बैठक उत्साहात पार पडली. तालुक्यात युवक संघटनेची घडी मजबूत करण्यासाठी आणि अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखालील शासनाच्या विविध योजनांचा लाभ ग्रामीण भागातील सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा ठोस कार्यक्रम यावेळी ठरविण्यात आला. या बैठकीचे नियोजन राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस किनवट तालुका अध्यक्ष संजय भाऊ सिडम आणि नांदेड जिल्हा सरचिटणीस विशाल भाऊ जाधव यांनी केले होते. बैठकीदरम्यान तालुक्यात राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे सदस्यत्व वाढवण्यावर भर देण्यात आला. आगामी काळात युवकांमध्ये अधिक जोमाने काम करत संघटनेचे नेटवर्क वाढवण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी केला. या बैठकीस राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे नेते सुगत नगराळे, विधानसभा अध्यक्ष वैजनाथ खरपुडे पाटील, माजी नगराध्यक्ष आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते इशा खान साहेब, मोनू गायकवाड, विकी शेंडे, मोहनभाई शेख, किनवट शहराध्यक्ष इलियास मोहम्मद, नवीन जाधव, चेतन मुंडे, माजी नगरसेवक इम्रान खान, समीर जायभाय, निखिल डांगे, बंटी गोरे, लकी राठोड यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. जिल्हाध्यक्ष स्वप्निल इंगळे पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस ही युवकांसाठी संघर्ष करणारी चळवळ आहे. गावपातळीपासून तालुका आणि जिल्हा पातळीपर्यंत युवकांना संघटित करून शाश्वत नेतृत्व निर्माण करणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. अजित दादांचे नेतृत्व राज्यात सक्षम आहे आणि त्यांच्या योजना योग्य पद्धतीने ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी युवकांनी पुढे यावे.बैठकीच्या शेवटी कार्यकर्त्यांनी पक्षासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार केला. युवकांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण वातावरणात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

## गाव तिथे महाराष्ट्र समिती पक्षाची शाखा काढणार : माजी आ.शंकर आण्णा धोंडगे

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, दि.०२ जून -**



संपुर्ण राज्यामध्ये प्रत्येक जिल्हात महाराष्ट् राज्य समिती पक्षाची पक्ष बांधणीचे कामाला जोमाने सुरुवात झालेली असुन जनतेतुन चांगला प्रतिसाद मिळत आहे . नांदेड जिल्हयासह कंधार लोहा तालुक्यात गाव तिथे शाखा काढणार आसे प्रतिपादन माजी आमदार शंकर आण्णा धोंडगे यांनी पत्रकार परीषेद केले.

दि. १जुन रोजी एस.आर.टि.डीएड कालेज बाळांतवाडी येथे एम.आर. एस.पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आमदार शंकर आण्णा धोंडगे यांच्या वतीने पत्रकार परीषेद चे आयोजन करण्यात आलेले होते पुढे बोलताना धोंडगे असे म्हणाले की एम आर एस पक्षाच्या स्थापनेला आक्टोंबर २०२५ ला एक वर्ष पुर्ण होत असुन महाराष्ट्रात सर्व विभागात एम आर एस पक्षाचे नेते व कार्यकर्त्यां कडून पक्ष बांधनीचे कामाला सुरुवात झाली असुन सर्व सामान्ये जनतेतुन त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे कंधार लोहा तालुक्यासह जिल्हयाताही पक्षाच्या वर्ष पुर्ती पर्यंत गाव तीथे शाखा काढून पक्षवाढी साठी जोमाने प्रयत्न करणार .सध्या राज्याची सामाजीक आर्थिक राजकीय परीस्थिती बिकट झाली असुन सिंचन शिक्षण रोजगार आरोग्य उर्जा व दरडोई उत्पन्नात राज्य मागे पडत आहे. शेतक-यांना सताधार्यांनी शेंतक-यांना दिलेली आश्वासने दुर्लक्ष करत आहेत एम आर एस पक्षाच्या वतीने शेतकरी आत्महत्या मुक्त महाराष्ट् ,ई.व्हि.एम मुक्त निवडणुका ,शेती शिक्षण आरोग्य सिंचन विज,उद्योग साठी भरीव अर्थसंकल्पीय तरतुद ,तंत्रज्ञानाची उपलब्धता ,सर्व स्तरातील महीलांना कायदेशीर सरक्षण या पंचसुत्री कार्यक्रमाधारे पक्षाची वाटचाल होईल असे माजी आमदार धोंडगे म्हणाले या वेळी जि.प.चे उपाध्यक्ष दिलिप धोंडगे,शिवराज पाटिल धोंडगे,दत्ता पवार,सुभाष मोरे दिंगबर दांडेगावकर यांची उपस्थिती होती.

## डॉक्टारांच्या हलगर्जीपणामुळे महिलेचा मृत्यू झाल्याचा नातेवाईकांचा अरोप

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.०२ जून -**

डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे सिझर करून प्रसुती झालेल्या महिलेचा मृत्यू झाला. असा आरोप करीत संबंधित डॉक्टरवर गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी मृत महिलेच्या नातेवाईकांचा जमाव सोमवारी दुपारी भाग्यनगर पोलिस ठाण्यात ठाण मांडून बसला होता. यामुळे काही वेळ तणाव निर्माण झाला होता. त्यावेळी पुढे येणाऱ्या वैद्यकीय अहवालानुसार कारवाई करू, असे आश्वासन देऊन पोलिस निरीक्षक रामदास शेंडगे यांनी जमावाला शांत केले. याबाबत अद्याप गुन्हा दाखल झाला नसून पोलीसांचा पुढील तपास सुरू आहे.

लोहा तालुक्यातील उमरा तांडा येथील रहिवासी आरती रतन राठोड ही महिला ३१ मे रोजी शहरातील माणिक नगर, कॅनॉल रोड, तरोडा भागातील फोर्टीज हॉस्पिटल येथे प्रसूतीसाठी दाखल झाली. महिलेला गंभीर अवस्थेत तिरुमला हॉस्पिटल येथे अधिक उपचारासाठी १ जून रोजी पाठविण्यात आले होते. मात्र २ रोजी आरती राठोड या महिलेचा सकाळी मृत्यू झाला. त्यामुळे मृत महिलेच्या नातेवाईकांचा संताप अनावर झाला. आरती राठोड हिचा मृत्यू डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच झाला असून फोर्टीज हॉस्पिटलच्या डॉक्टरवर गुन्हा दाखल करण्यात यावा, यासाठी मृत महिलेच्या ३० ते ४० नातेवाईकांनी भाग्यनगर पोलिस ठाणे गाठले. यानंतर भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या आवारात दुपारपर्यंत ठाण मांडून संबंधित डॉक्टरवर गुन्हा दाखल करावा ही मागणी लावून धरली होती.

## आ. कल्याणकरांमुळेच नांदेड उत्तरचा विकास झाला: आ. चिखलीकर



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.०२ जून -**

सर्वसामान्य कुटुंबातून जन्माला आलेल्या आ. बालाजीराव कल्याणकर यांनी नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचा गेल्या ५० वर्षात जो विकास झाला नव्हता तो अवघ्या अडीच वर्षात करून दाखवला आहे . त्यामुळे बालाजीराव कल्याणकर आमदार झाले नसते तर नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचा विकास झालाच नसता असे ठाम मत मांडत ज्येष्ठ नेते तथा आ प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आ. कल्याणकर यांच्या विकास कामाचा गौरव केला आहे.नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे विकास पुरुष आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला भक्ती लॉन्स येथे रामायणाचार्य हरिभक्त पारायण रामराव महाराज ढोक यांच्या भव्य कीर्तनाचा सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कीर्तन सोहळ्यात आ. चिखलीकर प्रमुख पाहुणे बोलत होते. यावेळी आ. बालाजीराव कल्याणकर यांच्यासह नांदेड दक्षिणचे आ. आनंदराव बोंढारकर , सौ. संध्याताई कल्याणकर , प्रवीण पाटील चिखलीकर, जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे , जिल्हाप्रमुख उमेश मुंडे , संपर्कप्रमुख संतोष भारसावडे , शहर प्रमुख श्याम कोकाटे, किशन कल्याणकर ,सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष नारायण कदम यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचे उपस्थिती होती .पुढे बोलताना आ. प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले की , बालाजीराव कल्याण हे सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे आले आहेत . जनतेशी त्यांची जुळलेली नाळ आणि विकास कामासाठी घेतलेले कष्ट यामुळे बालाजीराव कल्याणकर नांदेडच्या राजकारणात स्वतंत्र ओळख निर्माण करू शकले आहेत. माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या अत्यंत जवळचे आमदार म्हणूनही त्यांची ओळख आहे. त्यांनी नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात विकासाची असंख्य कामे खेचून आणली आहेत . गेल्या पन्नास वर्षांच्या काळात नांदेड उत्तरच्या विकासासाठी कुणालाही काहीही करता आले नव्हते मात्र आ. कल्याणकर यांनी ५० वर्षाच्या विकासाचा अनुशेष भरून काढत अवघ्या अडीच वर्षाच्या काळात नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचा चेहरा मोहरा बदलला आहे. त्यामुळे आ. कल्याणकर झाले नसते तर नांदेड उत्तरचा विकास झाला नसता असे मतही आ. चिखलीकर यांनी व्यक्त केले . शिवाय हे म्हणाले की , नांदेड उत्तरच्या जनतेने बालाजीराव कल्याणकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांना आमदार म्हणून निवडून दिल्याबद्दल मी मतदारांना नतमस्तक होऊन अभिवादन करतो अशा शब्दात आ. चिखलीकर यांनी आभार मानले.

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे स्मारक केवळ आ. कल्याणकरणामुळेच**

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचे नांदेडमध्ये स्मारक व्हावे ही संकल्पना मांडून ती पूर्ण करण्यासाठी सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करण्याचे कामही आ. कल्याणकर यांनी केले आहे. कोणी काहीही म्हणो परंतु पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकाचे संपूर्ण श्रेय केवळ आणि केवळ आ. बालाजीराव कल्याणकर यांना जाते. त्यामुळे या स्मारकाचे उद्घाटन करताना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या वंशाजास निश्चितपणे बोलवा अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. स्व. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचे अनावरण नुकतेच करण्यात आले परंतु नाईकांच्या कुटुंबियांना साधे निमंत्रण देण्यात आले नाही. त्यामुळे अशी चूक आपली होऊ नये अशा सूचना त्यांनी केल्या. यावेळी भाविकभक्त आणि आ. कल्याणकर यांचे चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , अजित पवारांसह अनेकांनी केले अभिष्टचिंतन**

आ . बालाजीराव कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री अजितदादा पवार , ना. हेमंत पाटील यांच्यासह अनेक ज्येष्ठ श्रेष्ठ मान्यवरांनी भ्रमणध्वनीवरून त्यांना त्यांचे अभिष्टचिंतन केले. शिवाय आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या प्रकृतीची आस्थेवाईकपणे विचारपूस केली.

**आ. बालाजीराव कल्याणकर यांची प्रकृती ठणठणीत : जिल्हाप्रमुख बडूरे**

नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे विकासपुरुष आ. बालाजीराव कल्याणकर यांना काल थोडे अस्वस्थ वाटत होते. त्यामुळे ते मुंबई येथे खाजगी रुग्णालयात उपचार घेण्यासाठी गेले आहेत. त्यांची प्रकृती ठणठणीत आहे. त्यामुळे आ. कल्याणकर यांच्या चाहत्यांनी आणि नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे यांनी केले आहे.

## भोकर येथे अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती निमित्त ध्वजारोहण व रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि.०२ जून-**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भोकर येथे ध्वजारोहण व रक्तदान शिबीर संपन्न झाले आहे. राजमाता राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त भोकर येथे ३१ मे २५ रोजी तामसा रोड डि.बी.महाविद्यालयासमोर असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक या ठिकाणी सकाळी अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेचे पुजन नेते अत्रीक पाटील मुंगल, प्रा.व्यंकट माने,भाजप नेते राजेश करपे यांच्या हस्ते करण्यात येऊन ध्वजारोहण ही फडकविण्यात आले.यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा विजय असो, येळकोट येळकोट जय मल्हार अशा घोषणा देण्यात आल्या.यानंतर १० वाजता तेथेच रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले.या शिबीराचे उद्घाटन भोकर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी अनेक रक्तदात्यानी रक्तदान केले आहे. यावेळी भोकर विधानसभा जनतेचे आमदार पप्पू पाटील कोंढेकर,भाजप तालुका अध्यक्ष दिवाकररेड्डी सुरकुंटवाड, संदीप गौड पाटील यांनी भेट दिली. हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यशवंत सेनेचे मराठवाडा अध्यक्ष नागोराव शेंडगे, शिवसेनेचे सुभाष नाईक किनीकर,मंडळ अध्यक्ष अवधुत पा.ईळेगावकर,राजेश हाके, सुशील शिंदे, निलेश चिकाळकर,खंडु गोरे, बालाजी परडे, कृष्णा कवळासे,जळबाराव पा.नरोटे,खंडेराव शेंडगे, बालाजी कोकणे,हनमंत हुलगुंडे, चंद्रशेखर हुलगुंडे, पत्रकार कैलास कार्नीदे, पत्रकार उत्तम कसबे, कैलास पाटील, गुलाब पाटील, शिवाजी पाटील,दिलीप तिवारी, सर्जेराव शिंदे, हनमंत चोंडे, विश्वजीत वाडेकर, शिवाजी वाडेकर, निरंजन पाटील ईळेगावकर, बळवंत पा.हुलगुंडे, शिवाजी पा.शिंदे, हनमंत शिंदे बालाजी ईसनकर,तेजस मलदोडे, स्वप्नील शेंडगे, श्रीनिवास लामगे,शंकर डांगरे,देवबा शिळेकर,बळीराम माने, गोविंद वाडेकर, सतीश माने,मारोती बिरगाळे ,रामराव वरणे सह असंख्य अहिल्यादेवी होळकर प्रेमी उपस्थित होते.

अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे संस्थापक नेते, पत्रकार व सुप्रसिद्ध साहित्यिक इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर , सामाजिक कार्यकर्ते त्रिरत्न भवरे आणि पत्रकार गंगाधर घनःश्याम सोनटक्के या नांदेड जिल्ह्यातील तिघांना हा मानाचा क्रांतीकारी संत कबीर राष्ट्रीय पुरस्कार - २०२५ जाहीर झाला आहे येत्या बुधवार दि. ११ जून २०२५ रोजी दुपारी १२:३० वाजता क्रांतीकारी संत कबीर वाचनालय, कामठी जि. नागपूर येथे संत कबीर यांच्या ६२७ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रांतीकारी संत कबीर मेगा फेस्टिव्हल- २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त पुरस्कार वितरण आणि निवडक कवींचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

## राज्य परिवहन महामंडळाचा वर्धापनदिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**लोहा , दि.०२ जून -**



कंधार व लोह्याचे आगार प्रमुख अभय वाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य परिवहन महामंडळाचा ७७ वां वर्धापन दिन फुलांची सजावट व रांघोळी टाकुन लोहा बसस्थानकात साजरा करण्यात आला.अनेक प्रवाशांना पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला यावेळी नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, छत्रपती धुतमल, केशवराव मुकदम हारीभाऊ चव्हाण, पपन बोडके, विष्णु शिंदे, सिकंदर सय्यद,वाहतूक निरीक्षक आर व्हीं कदम, वाहतूक नियंत्रक मनोहर लाडगे, ज्ञानोबा गायकवाड, एस.टी पास विभागाचे राजू धुतमल, संजय राहाटकर,विजय चन्नावार,लक्षम पवार, शेख बाबा, कैलास पाटील, शेख रफिक, आकाश महाबले, शैलेश कापूरे, कैलास पाटील , धनंजय कांबळे,चिकु गोडबोले,राजू वाघमारे,अजय ढवळे,भागवत ,सिक्युरीटी गार्ड शेख लतिफ, प्रवीण वाघमारे, माधव केंद्रे बालाजी घुगे ,डी पी केंद्रे , यांच्यासह बाहेरगावी जणारे अनेक प्रवाशाची उपस्थित होती.

## गोकुळ येथे मध्यरात्री नदीपात्रात वाळू चोरी करणारे ट्रॅक्टर जप्त

**तभा वृत्तसेवा**
माहूर, **दि.०२ जून -**



माहूरचे तरुण तडफदार,कर्तव्यदक्ष आणि धडाकेबाज तहसीलदार किशोर यादव यांची बदली झाल्याचे कळताच आता आपल्याला रान मोकळे झाल्याचे समजून या संधीचा फायदा उचलण्यासाठी यहाँ के हम सिकंदर म्हणत तालुक्यातील वाळू तस्कर पुन्हा एकदा सक्रीय झाल्याचे गोकुळनगर येथील महसूल पथकाने अवैध वाळू चोरी करताना रंगेहाथ पकडलेल्या एका ट्रॅक्टर जप्तीच्या कारवाईने उघड झाले आहे. यासंदर्भात गोपनीय माहिती मिळताच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, सहाय्यक जिल्हाधिकारी झेनीत चंद्र दोंथुला यांचे मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार उर्फ महाकाल कैलास जेठे आणि महिला तलाठी ज्योती दुर्योधन यांचेसह इतर तलाठी व महसूल कर्मचाऱ्यांनी तात्काळ ॲक्टीव्ह मोडवर येत जीवाची पर्वा न करता पैनगंगा नदीपात्रातील पाण्यातून जाण्याचे जोखिम उचलून ट्रॅक्टर मध्ये चोरीची वाळू भरून पळून जाण्याच्या तयारीत असताना त्यास रंगेहात पकडून सदरील ट्रॅक्टर मुद्देमालासह जप्त करून माहूर तहसील कार्यालयात जमा केल्याची धाडसी कारवाई रविवारी दि.०१ मे रोजी मध्यरात्रीच्या सुमारास करण्यात आली. आपल्या तीन वर्षाच्या प्रशासकीय कार्यकाळात अवैध गौणखनिज उत्खनन आणि वाहतुकीविरोधात विशेषतः वाळू तस्करी रोखण्यासाठी वाहन जप्तीसह दंडात्मकस्वरुपात धडक कारवाईची मोहीम राबवत तालुक्यात वाळू तस्करीवर लगाम लावण्यात मोठ्या प्रमाणात यशस्वी होत वाळू माफियांना सळो की पळो करून सोडलेले माहूरचे कर्तव्यदक्ष धडाकेबाज तहसीलदार किशोर यादव यांची बदली झाल्याचे कळताच अज्ञातस्थळी भुमिगत झालेले वाळू माफियांचे हस्तक वाळू तस्कर अचानक पावसाळ्यातील भुछत्राप्रमाणे उगवण्यास सुरू झाल्याचे दिसून येत आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे रविवार दि.१ रोजी माहूर तालुक्यातील गोकुळ नगर येथे रेतीची चोरीच्या मार्गाने वाहतुक सुरू होणार असल्याची कुणकुण महसुल पथकाला लागली असता, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले तथा सहाय्यक जिल्हाधिकारी झेनीथ चंद्र दोंथूला यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार कैलास जेठे उर्फ महाकाल, मंडळ अधिकारी शंकर चंदनकर, तलाठी ज्योति दुर्योधन, तलाठी अभिजीत कुडमते, तलाठी सी. पी. बाबर, तलाठी साहेबराव गावंडे, कोतवाल सागर हिवाळे, दीपक लोखंडे, लक्ष्मण मेश्राम, विष्णू देवारे या महसूल अधिकारी कर्मचारी पथकाने मध्यरात्रीच्या काळ्याकुट्ट अंधारात काठीच्या साह्याने पैनगंगा नदीतील पाण्याचा अंदाज घेत नदीपलीकडून येत असलेल्या एका ट्रॅक्टरला पकडले. यापुढे जर वाळू तस्करांनी अवैध वाळू चोरी व वाहतूक थांबवली नाही तर महसूल प्रशासन याला रोखण्यासाठी पूर्ण तयारीनिशी सज्ज असून, वेळप्रसंगी अशाप्रकारच्या धडक कारवाया यापुढेही सुरूच राहतील.तालुक्यात कुठेही वाळू तस्करी सुरू असल्याची माहिती नागरिकांनी दिल्यास तात्काळ वाळू गौण खनिज तस्करांच्या नांग्या ठेचून काढण्यास मागेपुढे पाहणार नाही! असे आश्वासन पर्यावरणप्रेमी नागरिकांना दिले आहे.माझ्या अखत्यारीत येत असलेल्या कोणत्याही गावामध्ये गौण खनिज तस्करी अजिबात खपवून घेतली जाणार नाही! अशा स्पष्ट आणि कडक शब्दात तलाठी ज्योती दुर्यो धन यांनी या धडाकेबाज कारवाईनंतर वाळू तस्करांना ठणकावले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### सेलू उपजिल्हा रुग्णालयातील महा डायलिसिस विभाग कार्यान्वित

**सेलू,/प्रतिनिधी :** येथील उपजिल्हा रुग्णालयात महालॅबतर्फे सोमवार २ जून पासून महाडायलिसीस विभाग कार्यान्वित करण्यात आला आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार, बाह्य संपर्क वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्याण कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकीय अधिक्षक डॉ. जनार्दन गोळेगावकर यांच्या प्रयत्नातून १० एप्रिल रोजी पालकमंत्री सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्याहस्ते या महाडायलिसीस विभागाचे उद्घाटन करण्यात आले होते. हा डायलेसिस विभाग आज २ जून रोजी कार्यान्वित झाला आहे. हा महा डायलिसिस विभाग उपजिल्हा रुग्णालयांमध्ये बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत म्हणजेच महालॅब मार्फत चालवण्यात येत आहे. ज्या ठिकाणी डायलेसिस टेक्निशियन आकाश जाधव, स्टाफ नर्स शिवकन्या काळे या कार्यरत आहेत.

या विभागामध्ये आज सीमा सहदेव काळे (वय २५ वर्ष राहणार डेंगळे पिंपळगाव) या रुग्णास डायलेसिस करण्यात आले. संबंधित रुग्णाला आठवड्यातून दोनदा सोमवार आणि गुरुवार रोजी डायलिसिस करण्यात येणार आहे. या रुग्णाला डायलिसिस करण्याकरता उपजिल्हा रुग्णालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच टेक्निशियन आणि स्टाफ नर्स यांनी सहकार्य केले. दरम्यान, सेलू शहर व परिसरातील ज्या रुग्णांना डायलिसिसची आवश्यकता आहे अशा रुग्णांनी उपजिल्हा रुग्णालय सेलू येथील डायलेसिस सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वैद्यकीय अधीक्षक डॉ. जनार्दन गोळेगावकर यांनी केले आहे.

### खरीप पूर्व मशागतीच्या कामांना वेग मजुराअभावी मशागतीची कामे यंत्राने

**गंगाखेड,/प्रतिनिधी:-** शेतीतील मशागती कामांना वेग एप्रिल संपूनही मे महिन्याचे चार आठवडे झालेत तरीही शेतीतील मशागतीची कामे बहुतांशी शेतकरी यंत्राच्या सहाय्याने व ट्रॅक्टरच्या साह्याने करत आहेत. पूर्वी मशागतीचे कामे नांगरणी करण्यासाठी कुठे चार बैल तर कुठे सहा बैलाच नांगर दिसत असे, मात्र सत्य परिस्थिती अशी दिसत नसून मजुराचा व बैलांचा अभाव असल्या कारणाने शेतकरी आता ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतीतील मशागतीची कामे करण्यासाठी तो सद्य स्थितीमध्ये शेत शिवारात मग्न दिसत आहे.

पराठी जमा करणे , काश्या वेचने, ज्वारीचे धसकट वेचेणे यासाठी पूर्वी महिला मजूर मिळत असे मात्र दिवसेंदिवस मजुरांचा अभाव असल्यामुळे शेतकरी रोटावेटर च्या साह्याने ज्वारीचे धसकट, शेतातीलकाडी कचरा बारीक, करण्यासाठी सरास रोटावेटरचा वापर होत आहे. बोटावर मोजणे इतकेचं कामे मजुराच्या साह्याने केली जात आहेत. आज स्थितीला बैलाचे वाढले भाव त्यांना सांभाळण्यासाठी लागणारी कसरत आणि चारापाणी याचा आर्थिक हिशोब ठेवला तर बहुतांश अल्प भूधारक शेतकऱ्यांना बैल जोडी परवडत नाही.त्यामुळे बहुतांश शेतकरी दुसऱ्याच्या बैलाच्या साह्याने आपली आंतरमशागतीची कामे पैसे देऊन करून घेतात. याचा परिणाम आंतरमशाबादीची कामे वेळेवर होत नाहीत.त्यामुळे उत्पन्नात घट होण्याची शक्यता असते. त्यामुळे बहुतांश शेतकरी यंत्राच्या साह्याने शेती करत आहेत.

### लॉयन्स क्लब गंगाखेड गोल्डसिटीची कार्यकारिणी जाहीर

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** शहरातील समर्थ हॉटेल येथे लॉयन्स क्लब गंगाखेड गोल्डसिटीची बैठक (दिनांक ३० मे शुक्रवार) रोजी झोन चेअरपर्सन लॉ.अतुल गंजेवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली या बैठकीमध्ये येणाऱ्या २०२५- २६नवीन वर्षाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

सर्वानुमते अध्यक्ष म्हणून लॉ.संजय धारे(रुद्रवार), सचिव म्हणून लॉ.गोपाल मंत्री, कोषाध्यक्ष म्हणून लॉ.नानासाहेब पाटील,प्रथम उपाध्यक्ष लॉ.बाळासाहेब यादव,द्वितीय उपाध्यक्ष लॉ.चंद्रकांत गादेवार यांचे नावे जाहीर करण्यात आले. या नवनियुक्त कार्यकारणीचा शपथविधी सोहळा येणाऱ्या जुलै महिन्यात मोठ्या दिमाखात पार पडणार असल्याची माहिती झेडसी लॉ.गंजेवार यांनी दिली. या बैठकीस मावळते उपाध्यक्ष लॉ.बाळासाहेब यादव, कॅबिनेट ऑफिसर लॉ.गोविंदराज रोडे,कोषाध्यक्ष लॉ.अभिनय नळदकर, अध्यक्ष लॉ. जगदीश तोतला, कॅबिनेट ऑफिसर लॉ.संजय सुपेकर, सचिव लॉ.भगत सुरवसे, उपाध्यक्ष लॉ.चंद्रकांत गादेवार, झोन चेअरपर्सन लॉ.अतुल गंजेवार, लॉ.राजू लांडगे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

### राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त तीनशे सूर्यनमस्काराची मानवंदना

**गंगाखेड,/प्रतिनिधी:-** येथील स्वदेशी आखाडाच्या वतीने (दिनांक ३१ मे शनिवार) रोजी लोकमाता राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती तथा त्रिशताब्दी जन्मोत्सव २०२५ ब्रह्म मुहूर्तावर साजरा करण्यात आला जयंती निमित्त योगगुरु प्रकाश डीकले यांच्या नेतृत्वाखाली एक दिवशीय योग शिबिर आयोजित करण्यात आले होते.

सदरील कार्यक्रमादरम्यान अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अहिल्या वंदना अहिल्यादेवीची आरती शंखनाद तसेच ३०० वी जयंती असल्यामुळे ३०० सूर्यनमस्काराची मानवंदना राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना देण्यात आली याप्रसंगी श्री नरेंद्र गिरी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पवार, उद्योजक संजय धुळे, योग शिक्षक लक्ष्मण निरस,विनायक राठोड, राजाभाऊ खोडवे रॉयल अकॅडमीचे संचालक गणेश नागरगोजे, विद्यार्थी, मॉर्निंग ग्रुपचे सदस्य जिल्हा परिषदेचे माजी सभापती श्रीनिवास मुंडे,अतुल गंजेवार, अय्या,डहाळे, कृष्णाजी सोळंके आदी मान्यवर उपस्थित होते याप्रसंगी अकॅडमीतील विद्यार्थ्यांना स्वदेशी आखाड्याच्या वतीने सूर्य नमस्कार पूस्तके तसेच प्रा.आसुरे सरांच्या वतीने शिवाजी कोण होता या पुस्तकाच्या ५० प्रती भेट देण्यात आल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आखाड्याचे संचालक योगगुरू प्रकाश डिकळे यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# दोन हजारांची नोट चलनातून गायब!

## नोट बंदी नंतर पहिल्यांदाच आली होती नव्या रंगात; सुटे मिळत नव्हते तेव्हा झाली होती फजिती

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** दोन हजारांची नोट चलनातून गायब! नोट बंदी नंतर पहिल्यांदाच आली होती नव्या रंगात; सुटे मिळत नव्हते तेव्हा झाली होती फजिती झाली होती.

नोटबंदीनंतर नव्यानेच चलनात आलेली रंगीबेरंगी दोन हजार रुपयांची चलनी नोट सर्वांचे आकर्षण ठरली. प्रथमच दोन हजार रुपयाची नोट पाहायला मिळाल्याने अनेकांना आनंदही झाला पुढे हळूहळू ती दोन हजाराची नोट चलनातून गायब झाली त्यामुळे अखेर ही नोट दडली कुठे? हा एक संशोधनाचा विषय बनला आहे. भारतीय चलनाच्या जमान्यात अनेक रंगात अनेक ढंगात निरनिराळ्या नोटा आल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या नोट बंदी नंतर नवीनच दोन हजारांची नोट चलनात आली आणि सर्वांसाठी कुतूहल व आकर्षण ठरली होती. नोटबंदी नंतर सुरुवातीच्या काळात नवीन नोटांची छपाई होताना सर्वप्रथम दोन हजाराची नोट चलनात आली आणि अनेकांची चिल्लरांसाठी दाणादाण उडविली. एवढी मोठी नोट चलनात आल्यामुळे अडचण निर्माण झाली. प्रत्येकाच्या हातात, खिशात दोन हजाराचीच नोट दिसू लागली. जो तो खरेदीसाठी दुकानदाराकडे जाईल त्यावेळेस त्याच्याकडे दोन हजाराची नोट असायची. परंतु दुकानदाराला त्याचे सुट्टे पैसे परत देण्यासाठी मोठी दमछाक करावी लागायची. कालांतराने नवीन ५००,२००,१००,५०,२०,१० रुपयांच्या नोटा तयार करण्यात आल्या व चलनात आल्या त्यामुळे चिल्लर पैशाचा तुटवडा हळूहळू कमी झाला. जसा चिल्लर पैशाचा तुटवडा कमी झाला तशी दोन हजाराची नोट हळूहळू चलनातून गायब होण्यास सुरुवात झाली. बघता



बघता आज दोन हजाराची नोट शोधूनही मिळेनाशी झाली आहे. अखेर ही नोट दडली कुठे? हा एक संशोधनाचा विषय बनला आहे. श्रीमंत लोकांनी पैशाची साठवणूक करण्यासाठी या नोटा साठवून ठेवल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसाला दोन हजाराची नोट पाहणे आता दुर्मिळ झाले आहे.सध्या संपूर्ण देशामध्ये पैशाचा ऑनलाईन व्यवहार सुरू आहे त्यामध्ये आरटीजीएस,डिडी, बँकेचे ॲप,क्यू आर कोड, फोन पे, गुगल पे,युपीआय नंबर,भीम ॲप, एटीएम, आधार कार्ड ई. प्रकारे अनेक नागरिक मोठ्या रकमेसह लहानसहान रकमेचा ऑनलाईन व्यवहार करत आहेत. त्यामुळे चलनी नोटांचा फारसा अडसर दिसून येत नाही. परंतु सुट्टीच्या दिवशी अथवा नेटवर्कर अडचण असताना मात्र अनेकांना अडचणी उद्भवतात. परंतू रिझर्व बँकेने नागरिकांच्या सेवेसाठी तयार केलेली दोन हजाराची चलनी नोट गेली तरी कुठे? आता ती गरिबाला पाहणे दुर्मिळ झाले आहे. कारण नोटबंदी नंतर जन्मलेल्या व्यक्ती ला मात्र ही नोट पाहता येईल की नाही? हा कुतूहलचा विषय ठरला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने सर्वसामान्य देशातील नागरिकांच्या दैनंदिनी जीवनामध्ये होणाऱ्या देवानघेवाणीचे चलन म्हणून नोटांची निर्मिती केली आहे. परंतु ही नोट अचानक व नकळत चलनातून गायब झाल्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे दररोजच्या चलनी व्यवहारांमध्ये अनेकांना ठोक रक्कमेची देवाणघेवाण करायची असल्यास मोठी अडचण निर्माण होत आहे. तसेच एखाद्या मोठ्या खरेदीसाठी बाहेरगावी जात असताना अनेक व्यापाऱ्यांना या दोन हजाराच्या नोटांचा मोठा फायदा होत असे. जेणेकरून या नोटा च्या माध्यमातून जास्त रक्कम घेऊन जाण्यास मदत होत असे परंतु ही नोट गायब झाल्यापासून अनेकांच्या दैनंदिन व्यवहारातील अडचणीत वाढ होताना दिसत आहे. अखेर ही नोट दडली कुठे? हा एक शासनाच्या दृष्टीने संशोधनाचा विषय ठरला जात आहे.

## पिंपरी देशमुख येथील २१ वर्षीय तरुण झाला बेपत्ता

**परभणी,/प्रतिनिधी :** ताडकळस येथून जवळच असलेल्या पिंपरी देशमुख येथील २१ वर्षीय तरूण शुक्रवारी (दि.३०) रात्री ९.३० ते शनिवारी (दि.३१) सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान बेपत्ता झाला आहे.

राजेश्वर बाबुराव कहाते यांनी रविवार (दि.१) ताडकळस पोलीसात दिलेल्या माहितीनुसार पिंपरी देशमुख येथील पंढरी राजेश्वर कहाते (वय २१) हा गट नं. ३०० येथील शेत आखाडयावरून बेपत्ता झाला आहे. पंढरी कहाते याची उंची अंदाजे ५ फुट, अंगावर निळा टिशर्ट, काळी नाईट पँन्ट, अनवाणी, मध्यंम बांधा, टोक्याचे बारीक केस व मराठी, हिंदी लिहिता वाचता येते. तसेच त्याच्याकडे रेडमी कंपनीचा मोबाईल आहे. या वर्णनाचा तरूण आढळल्यास माहिती देण्याचे आवाहन ताडकळस पोलीसांनी केले आहे.दरम्यान, राजेश्वर बाबुराव कहाते यांनी ताडकळस पोलीसांना दिलेल्या माहितीच्या आधारे मिसिंगची केस नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस जमादार संतोष चाटे करत आहेत. दरम्यान सदर तरुण बेपत्ता झाल्यानंतर त्याच्या आई-वडीलांना तात्काळ नातेवाईकांकडे दुरध्वनीव्दारे संपर्क साधला होता परंतू तरी देखील त्याचा कोणत्याही नातेवाईकडे आला नसल्याचा सुर दिसून आला होता.

## काँग्रेस कमिटीकडून अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**परभणी,/प्रतिनिधी:** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त दिनांक ३१ मे रोजी परभणी काँग्रेस कमिटी व छत्रपती फुले शाहू आंबेडकर महोत्सव समिती कडून अभिवादन करण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त शहरातील शनिवार बाजार भागातील राजीव भवन जिल्हा काँग्रेस कमिटी कार्यालयात कार्यक्रम घेऊन अभिवादन करण्यात आले.



यावेळी काँग्रेस जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुरेशराव वरपुडकर यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष माजी खा. तुकाराम रेंगे पाटील, भगवान वाघमारे, प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब देशमुख, श्रीधर देशमुख, बंडू पाचलिंग, खदीर लाला हाश्मी, बाळासाहेब फुलारी,अमोल जाधव, सुहास पंडित, सुनील देशमुख,विनोद कदम, श्रीकांत पाटील, वैजनाथ देवकते, शजी अहेमद खान, सत्तार पटेल, तब्बू पटेल, कल्याण लोहट आदी उपस्थित होते.

तसेच काँग्रेस कमिटीतर्फे स्थापन छत्रपती शिव फुले शाहू आंबेडकर जयंती महोत्सव समितीकडून परभणी येथील प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडियम मुख्य प्रवेशद्वारा जवळील नियोजित जागेवर पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष माजी खा. तुकाराम रेंगे पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी समिती अध्यक्ष अमोल जाधव, माजी नगरसेवक सुनीलबाबा देशमुख, विनोद कदम, सुहास पंडित, शजी अहेमद खान, वैजनाथ देवकते, श्रीकांत पाटील, दिगंबर खरवडे, कल्याण लोहट, अंगद सोगे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक सुहास पंडित यांनी केले तर आभार दिगंबर खरवडे यांनी मानले.

### मध्यवर्ती बँक सामाजिक बांधिलकी जपणारी

**परभणी,/प्रतिनिधी:-** दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडुन आर्थिक सेवा पुरविण्यासोबतच सामाजिक बांधिलकीही जपली जात आहे, असे प्रतिपादन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व्यंकटेश कुरूंदकर यांनी केले.

बँकेत संलग्न असलेल्या ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे व इतर कर्मचाऱ्यांचे पगारीचे खाते असलेल्या कर्मचाऱ्यांचा रू.२५०००००/- चा अपघाती विमा काढण्याचा सामाजिक बांधीलकी म्हणुन बँकेचे अध्यक्ष सुरेशराव वरपुडकर, उपाध्यक्ष राजेश (भैया) पाटील गोरेगावकर उपस्थित होते.

## सेलू तालुक्यातील कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश

**सेलू,/प्रतिनिधी:** सेलू तालुक्यातील कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश घेण्यात आला होता.

तालुक्यातील कुंडी, देवगाव फाटा, लाडनांद्रा, आंबेगाव साखरे येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षातील प्रमुख कार्यकर्ते, सरपंच व पक्षीय पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या उपस्थितीत शनिवार ३१ मे रोजी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

पालकमंत्री बोर्डीकर यांच्या सेलू येथील संपर्क कार्यालयात हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी कुंडी येथील येथील सरपंच कैलासराव सुधाकरराव मोगल, उपसरपंच रामेश्वर सिताराम मोगल यांच्यासह गजानन अशोक मोगल, पांडुरंग भगवानराव मोगल, रमेश बळीरामजी मोगल, हरिभाऊ तातेराव मोगल, आप्पाराव डंबाळे, सुभाष दशरथराव गोंडगे, सिद्धार्थ ज्ञानोबा डंबाळे, सचिन शिवाजी मोगल, काशिनाथ बळीराम मोगल, अशोक सिताराम मोगल विठ्ठल, बाबुराव गोंडगे, भगवानराव नारायण बालटकर , अण्णासाहेब गणेशराव मोगल, प्रताप देविदास मोगल, अंकुश आसाराम मोगल, सुरेश रणजीत मोगल, पांडुरंग लक्ष्मणराव मोगल,व सर्व कुंडी गावातील सहकारी कार्यकर्ते देवगाव फाटा येथील सुनीलराव साळेगावकर, राजेभाऊ पवार, सखाराम चव्हाण, रावसाहेब मोरे, सतीश मोरे, आंबेगाव साखरे भाऊराव साखरे, माऊली साखरे, भगवान साखरे, विष्णुपंत साखरे, लाडनांद्रा येथील सतीश गायकवाड, भागवत गायकवाड, बळीराम सागडेव, काशिनाथ शिंगणे, रमेश गायकवाड, अशोक गाटे , बबलू गायकवाड, व्यंकटेश हिंगणे, महेश भदर्गे, गुलाब पडघने आदी कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. यावेळी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सेलू कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिनकर वाघ, भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष गणेश काटकर, डॉ. संजय रोडगे, अजय डासाळकर, शिवहरी शेवाळे, भागवत दळवे यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी पक्षाची पुढील दिशाही ठरवण्यात आली होती.

### जिल्हयातील अधिकाऱ्यांच्या बदल्या

**परभणी,/प्रतिनिधी-** महसुल विभागातील उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व नायब तहसीलदार संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

महसूल विभागाने ३० मे रोजी या बदल्यांबाबतचे आदेश काढले आहेत. यामध्ये परभणीचे उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे यांची उमरगा (जि. धाराशिव) येथे उपविभागीय अधिकारी म्हणून तर पाथरीचे उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांची जिल्हा पुनर्वसन अधिकारी जालना येथे बदली करण्यात आली आहे. याचबरोबर नियुक्तीच्या प्रतिक्षेत असलेले श्रावण श्रीरंग क्षीरसागर हे उपजिल्हाधिकारी सामान्य म्हणून परभणी येथे येत आहेत.

## सेलू येथील ब्राह्मण समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व समाजभूषण पुरस्कार

**शिवाजी आकात**

**सेलू ,/प्रतिनिधी-** येथील श्री भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने आयोजित समाजातील गुणवंत विद्यार्थी सत्कार व समाजभूषण पुरस्कार समारंभाचे आयोजन शुक्रवार दि.०६ जून २०२५ रोजी सायंकाळी ०५ वाजता श्री साई नाट्य मंदिर महेश नगर सेलू येथे करण्यात आले आहे.







कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे चिटणीस प्राचार्य.डॉ.व्ही.के. कोठेकर, प्रमुख पाहुणे म्हणून राज्यसभा खासदार तथा उपाध्यक्ष राष्ट्रीय महिला मोर्चा,पुणे डॉ.मेधा विश्राम कुलकर्णी तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून प्रदेशाध्यक्ष परशुराम हिंदू सेवा संघ तथा प्रदेश उपाध्यक्ष भाजप उद्योग आघाडी,पुणे श्री विश्वजीत देशपांडे यांची उपस्थिती राहणार आहे.

समाजभूषण पुरस्कारासाठी सेलू येथील ज्येष्ठ विधिज्ञ तथा शहराचे ग्रामदैवत केशवराज बाबासाहेब महाराजांचे वंशज तसेच श्री.के.बा.शि.प्र.मं.सेलू चे संस्थापक ॲड.लक्ष्मीकांत मल्हारराव सुभेदार व वालूर येथील सौ.सविता शिवाजीराव पाठक यांची समाजभूषण पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. वरील मान्यवरांच्या उपस्थितीत समाजभूषण पुरस्कार देण्यात येणार आहे. कार्यक्रमासाठी सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन श्री.भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात येत आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी समिती सदस्य परिश्रम घेत आहेत.

## मानवतच्या गृहरक्षक दलांच्या होमगार्ड सैनिकांना कवायत प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

**मानवत,/प्रतिनिधी-** मानवतच्या गृहरक्षक दलांच्या ( होमगार्ड ) सैनिकांना कवायत प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

मानवत पोलीसांबरोबर कर्तव्य पार पाडणाऱ्या होमगार्ड संघटनेच्या जवानांना मानवतच्या नेताजी सुभाष विद्यालयाच्या मैदानात दर रविवारी सकाळी कवायत प्रशिक्षण देण्यात येते.

पोलीस ठाण्यात कर्तव्य पार पाडणाऱ्या होमगार्ड जवानांचे आरोग्य , शरिर तंदुरुस्त रहावे , संघटनेच्या नियमावलीचे स्मरण रहावे यासाठी दर रविवारी शासनाने साप्ताहीक कवायत प्रशिक्षण देण्याबाबत आदेश दिलेले असुन त्यासाठी होमगार्ड पथक मानवत येथील पुरुष व महिला होमगार्डना नेताजी सुभाष विद्यालयाच्या भव्य मैदानात पी.टी. व कवायतचे प्रशिक्षण देण्यात येते ,अशी माहिती होमगार्डचे तालुका समादेशक श्री रामेश्वर काष्टे यांनी दिली.शासनाने होमगार्ड जवानांना नियमित कर्तव्यावर बोलावून त्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निकाली काढावा व होमगार्डना न्याय द्यावा अशी मागणीही पथकातील जवानांनी केली आहे.

# भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे विविध मागण्यांसाठी धरणे आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जून**
जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजूर, बांधकाम कामगार, गायरानधारक, वनजमीनधारक यांच्या विविध मागण्यांसाठी दि २ जून सोमवारी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.
यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादीकडून मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांचेमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले. या निवेदनात शासनाने आश्वासन दिल्याप्रमाणे शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी तसेच शेतकऱ्यांना नव्याने कर्ज वाटप करा, जनसुरक्षा विधेयक रद्द करा, महावितरणकडून बसवण्यात येणारे प्रीपेड मीटर बसविणे तत्काळ थांबवा, मान्सूनपूर्व पावसाने झालेल्या रब्बीचे पीक, उन्हाळ भूईमुग, केळी, ऊस या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करा, बोगस बियाणेवर आळा घालून विक्रेत्यांवर कार्यवाही करा, गायरान जमीन, वन जमीन आणि देवस्थानच्या जमीनी कसणाऱ्यांच्या नावे करा, संगायो, इंगायो तसेच श्रावणबाळ योजनेतील लाभार्थींचे थकीत १५०० रूपये प्रमाणे वाटप करा, उत्पन्नाची मर्यादा वाढवा, सन २०२३-२४ चे दुष्काळी अनुदान शेतकऱ्यांना तत्काळ वाटप करा, व्यक्तीगत लाभाच्या योजनेचे अनुदान थेट लाभधारकांच्या खात्यात जमा करा, नोंद झालेल्या बांधकाम कामगारांना तत्काळ सर्व लाभ द्यावेत आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. निवेदनावर किसान सभेचे जिल्हासचिव कॉ अंकुश बुधवंत, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हासचिव कॉ चंपतराव नाईक, किसान सभेचे अध्यक्ष कॉ सय्यद अझरअली, कॉ रमेश देवरे, कॉ उत्तम चंद्रवंशी, कॉ अमोल देशमुख, कॉ सुरेश काचगुंडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# हिंगोली न. प. कडून मान्सूनपूर्व नालेसफाई मोहीम सुरू



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जून**
येथील नगर परिषदेकडून मान्सूनपूर्व शहरातील नाले सफाई तसेच स्वच्छता मोहीम सुरू करण्यात आली असून सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालय ते केमिस्ट भवन येथील नाल्यातील गाळ जेसीबीच्या सहाय्याने काढून पावसाचे पाण्याला मार्ग मोकळा करून देण्यासाठी मोहीम सुरू होती.
यापूर्वी नगर पालिकेच्यावतीने शहरातील लहान मोठे तसेच मध्यम असे शहरातील तब्बल ६० ते ७० नाल्यातील गाळ, प्लास्टीक काढण्याची मोहीम हाती घेण्यात आली होती. जुन्या हिंगोली शहरातील मस्तानशहा नगर, महादेववाडी, मंगळवारा, पेन्शनपुरा तसेच पलटण आदी भागात नगर पालिकेच्या पथकांनी जेसीबीच्या माध्यमातून नालेसफाईचे कामे केली आहेत.
मुख्याधिकारी अरविंद मुंढे, उपमुख्याधिकारी साबळे, अभियंता प्रतीक नाईक, वसंत पुतळे, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, देवीसिंह ठाकूर यांच्यासह अधिकारी कर्मचारी यांनी या मोहीमेत सहभाग घेतला असून मान्सूनपूर्व सफाईचे काम युध्दपातळीवर राबविण्यात येत आहे. यासाठी सफाई कर्मचारी मोठ्या जोमाने कामाला लागले आहेत.
नदीकाठच्या भागातील नाले सफाई तसेच सखल भागातील कचरा साफ करण्याचे कामही करण्यात येत आहे. सध्या पावसाने मागील चार दिवसांपासून विश्रांती घेतली असून सोमवारी येथील जिल्हाधिकारी कार्यालय ते केमीस्ट भवन या भागात पावसातील नाल्याचे पाणी तसेच सिरेहक शाह बाबा तलावातील पाणी मोठ्या प्रमाणावर वाहून येत असल्याने याठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होते. मागील वर्षी या भागात मोठ्या प्रमाणावर पाणी घुसल्यामुळे जिल्हा परिषदेची निवासस्थाने, बांगर नगर आणि केमिस्ट भवन या भागात पाणी शिरले. त्यामुळे मोठे नुकसान झाले होते. त्याअनुषंगाने या भागात जेसीबीच्या माध्यमातून नाले सफाई करण्यात येत आहे.

# तोष्णीवाल कॉलेजजवळ दुचाकी अपघातात एक ठार, एक गंभीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जून**
सेनगाव येथून खुडजकडे दुचाकीवर निघालेल्या तरूणाचे तोष्णीवाल महाविद्यालय जवळील वळणावर दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने झालेल्या अपघातात एक तरूण जागील ठार झाला असून दुसरा गंभीर जखमी झाला आहे. जखमीला नांदेड येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे.



याबाबत अधिक माहीती अशी की, सेनगाव येथून महेश गजानन झाडे वय २२ आणि पुष्कर केशव झाडे वय २० हे दोघे त्यांच्या गावी खुडजकडे दुचाकीने भरधाव वेगाने निघाले होते. दोघेही तोष्णीवाल महाविद्यालयाजवळील वळणावर आले असता येथील जिनींग फॅक्टरीजवळ चालकाचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने ही दुचाकी २० ते २५ फुटापर्यंत घासत गेली. तेथे असलेल्या गडरवर महेश गजानन झाडे याचे डोके धडकल्याने त्याच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला असून पुष्कर केशव झाडे हा या अपघातात गंभीर जखमी झाला आहे. अपघाताची माहीती मिळताच खुडज येथील त्यांच्या नातेवाईकांनी पुष्करला प्रथम हिंगोली येथील सामान्य रूग्णालयात दाखल केले परंतु प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले आहे. या अपघातामुळे खुडज गावांवर शोककळा पसरली आहे.



**हिंगोली– येथील खटकाळी बायपास रस्त्यावरील रेल्वे विभागाच्यावतीने रेल्वे पूलाखालून भुयारी मार्ग तयार करण्यात येत असून या रस्त्यावरील भिंतींवर आकर्षक चित्रे तसेच वरच्या बाजूने शेड तयार करण्यात आला आहे. या रस्त्यामुळे पोलिस वसाहत, एसआरपी, गंगा नगर, हनुमान नगर, सुराणा नगर भागातील नागरिकांना वाहतुकीसाठी फायदा होणार आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन



हिंगोली– शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती परिसरात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, माजी जि प उपाध्यक्ष मनिष आखरे, मराठा सेवा संघाचे खंडेराव सरनाईक, शिवाजीराव ढोकर पाटील, ॲड भाकरे, ॲड अमोल जाधव, हरिभाऊ मुटकुळे, मिटकर, माजी नगरसेवक आमेर अली, महासंघाचे अध्यक्ष त्र्यंबकराव लोंढे, कल्याणकर आदींची उपस्थिती होती.

### केदारनाथ दर्शनासाठी २०० भाविक रवाना



हिंगोली– देवभूमी केदारनाथाचे द्वार नुकतेच उघडले असून याठिकाणी दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक जात आहेत. हिंगोली येथून सुमारे २०० भाविक केदारनाथ दर्शनासाठी रेल्वेने रवाना झाले आहेत. या भाविकांमध्ये दुबे, निलावार यांच्यासह महिला, पुरूष तसेच बच्चे कंपनीही रवाना झाली आहे. या भाविकांना रेल्वेस्थानकावर रवाना करण्यासाठी तसेच सत्कार करण्यासाठी भाजपचे शाम खंडेलवाल, ससे आदींची उपस्थिती होती. सर्व भाविकांना प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



हिंगोली– येथील गांधी चौकात फळविक्रेते रस्त्यावर हातगाडे उभे करून वाहतुकीस अडथळा निर्माण करीत आहेत.

# वर्दीळीच्या मेडीकल लाईन रोडवर बांधकाम साहीत्यामुळे कोंडी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जून**
शहरातील वर्दीळीच्या मेडीकल लाईन रस्त्यावर बांधकामासाठी आणलेली वाळू आणि इतर बांधकाम साहीत्य टाकल्यामुळे या अरूंद रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होत आहे. त्यामुळे या भागातील व्यापारी आणि रहीवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.
शहरातील जुने ग्रामीण पोलिस ठाणे, मेडीकल लाईन आणि व्यापारी दुकाने असणाऱ्या एका अरूंद रस्त्यावर मारोती मंदिराच्या पाठीमागे बांधकाम सुरू आहे. या बांधकामासाठी वापरात येणारी वाळू चक्क रस्त्यावर टाकल्यामुळे या रस्त्यावरून सतत येणाऱ्या वाहनांची कोंडी होत आहे. आधीच अरूंद रस्ता आणि त्यात रस्त्यावरच वाळू आणि बांधकामाचे इतर साहीत्य टाकल्यामुळे मोठी अडचण निर्माण होत आहे. नगर पालिका प्रशासन याकडे कानाडोळा करीत असल्याचे दिसत असून या भागातील व्यापारी आणि रहीवाशी रस्त्यावरील बांधकामाचे साहीत्य हटविण्याची मागणी करीत आहेत.



# कोवीडच्या पार्श्वभूमीवर जिल्हा रूग्णालयात सुविधांची चाचपणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जून**
जिल्ह्यात कोवीडच्या पार्श्वभूमीवर शासकीय रूग्णालयात सोमवारी वैद्यकीय अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेण्यात आली. यावेळी ऑक्सिजन तयार करणाऱ्या यंत्रांची चाचणी घेण्यात आली असून तातडीची गरज भासल्यास १०० बेड वाढविण्याची तयारी रूग्णालय प्रशासनाने केली आहे. राज्यात सध्याच्या स्थितीमध्ये कोवीडच्या रूग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. जिल्हास्तरावर तसेच ग्रामीण भागात रूग्णांची संख्या वाढल्यास तातडीने उपाय योजना हाती घ्याव्या लागणार आहेत. या पार्श्वभूमीवर हिंगोलीच्या रूग्णालयात शासकीय अधिष्ठाता डॉ चक्रधर मुंगल यांच्या उपस्थितीत वैद्यकीय अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी डॉ दिपक मोरे, डॉ नितीन पुरोहीत, डॉ भालेराव, डॉ नंदकिशोर करवा यांच्यासह वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.
यावेळी मुंगल यांनी हिंगोली शहरासह जिल्हाभरात रूग्णांची संख्या वाढल्यास काय तयारी आहे याचा आढावा घेतला. यावेळी कोवीड काळामध्ये मागील वेळी जास्तीत जास्त रूग्ण आढळून आले किती रूग्णांवर उपचार करण्यात आले. तसेच डेडीकेटेड कोवीड केअर सेंटर किती ठिकाणी स्थापन झाली याची माहीती घेतली. तसेच आवश्यक सुविधांचा आढावाही त्यांनी घेतला.
यावेळी ऑक्सिजन तयार करणाऱ्या मशीनची पाहणी केली. रूग्णालय परिसरात उभारण्यात आलेल्या २०० लिटर प्रति मिनीट ऑक्सिजन तयार करणाऱ्या मशीनची पाहणी करून आवश्यक तपासणीही करण्यात आली. तसेच लिक्वीड मेडीकल ऑक्सिजनचा पुरवठा याबाबतचा आढावा घेतला. जिल्ह्यामध्ये रूग्णांची संख्या वाढल्यानंतर तातडीने किती बेड उपलब्ध करता येतील याची माहीती घेण्यात आली. याशिवाय स्वॅब नमुने तपासणीच्या कामाचाही आढावा घेण्यात आला. किती आरटीपीसीआर किट उपलब्ध आहेत याची माहीती घेऊन पुणे येथील प्रयोगशाळेकडे नोंदविण्यात आल्याचे सुत्रांनी सांगितले. तातडीची गरज भासल्यास १०० बेड उपलब्ध करता येण शक्य असल्याचे सांगण्यात आले.

# वारंगा येथे पैनगंगा बोगद्यावरील अतिक्रमणे हटविली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जून**
कळमनुरी तालुक्यातील वारंगाफाटा येथे उध्वपैनगंगा प्रकल्प कार्यालयाकडून मागील ३ दिवस अतिक्रमण हटविण्यात आले. पैनगंगा बोगद्यावरही अतिक्रमणे करण्यात आली होती. ती अतिक्रमणे काढून टाकण्यात आली आहेत.
या मोहीमेत सुमारे ६० दुकानांचे अतिक्रमण काढण्यात आले. त्यामुळे येथील आठवडी बाजाराने मोकळा श्वास घेतला आहे. तसेच वारंगाफाटा येथून उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या वतीने इसापूर धरणाचे पाणी १२० फुट खोल बोगदा तयार करून नांदेडकडे नेण्यात आले आहे. गट क्रमांक ४४५ मधून हा बोगदा तयार करण्यात आला आहे. मात्र या बोगद्याचे काम पूर्ण झाल्यानंतर त्यावरील जमिनीवर अतिक्रमणे करण्यात आली होती. काहीजणांनी पक्के बांधकाम केले तर काही जणांनी टीनशेड उभारली होते. मात्र उर्ध्व पैनगंगा कार्यालयाने या अतिक्रमण धारकांना नोटीस पाठवून तातडीने अतिक्रमण हटविण्याच्या सुचना दिल्या होत्या. अतिक्रमण धारकांनी त्याकडे दुर्लक्ष केले त्यामुळे शुक्रवारपासून ३ जेसीबी आणि ४ ट्रॅक्टरच्या मदतीने अतिक्रमणे काढण्यात आली. काहीजणांनी स्वत: हून अतिक्रमणे काढली. या मोहीमेमुळे वारंगा फाटा येथील आठवडी बाजाराने मोकळा श्वास घेतला असून येथील वाहतुक कोंडीचा प्रश्नही मार्गी लागला आहे.

# महावितरण कंपनीकडून रन फॉर सेफ्टी मॅरेथॉन

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २ जून**
वीज ग्राहकांत वीज अपघातांबाबत जागरूकता निर्माण व्हावी, वीज अपघातांचे प्रमाण शून्यावर यावे म्हणून महावितरणने दिनांक १ जून रोजी मॅरेथॉन - 'रन फॉर सेफ्टी' चे आयोजन केले होते.




महावितरण नांदेड परिमंडळाचे मुख्य अभियंता यांच्या हस्ते या मॅरेथॉन - 'रन फॉर सेफ्टी' ला झेंडा दाखवून विद्युत भवन, अण्णाभाऊ साठे चौक येथून सुरुवात होवून आयटीआय कॉर्नर- वर्कशॉप कॉर्नर- नागार्जुन कॉर्नर या मार्गाने मॅरेथॉन विद्युत भवन, अण्णाभाऊ साठे चौक येथे सांगता झाली. सदर मॅरेथॉन मध्ये नांदेड परिमंडळ अंतर्गत नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यातील ५५० हून अधिक महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. या मॅरेथॉन - 'रन फॉर सेफ्टी'ला महावितरण मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, सहाय्यक महाव्यवस्थापक तसेच नांदेड, हिंगोली व परभणी जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
आम्ही सुरक्षेचे शिल्पकार शुन्य अपघाताने करू महावितरणचे ध्येय साकार हे ब्रिद घेऊन महावितरणच्या सर्व क्षेत्रिय कार्यालयात दि.१ ते ६ जून २०२५ दरम्यान विद्युत सुरक्षा सप्ताहात विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच भाग म्हणून महावितरणचे नांदेड परिमंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी साठे चौक पासुन ते आयटीआय-वर्कशॉप-नागार्जुन कॉर्नर ते साठे चौक पर्यंत धावले.
यावेळी कर्मचाऱ्यांनी वीज सुरक्षेचे संदेश देणारे फलक हातात पकडले होते. तसेच वीज सुरक्षेबाबत विविध घोषणाही देण्यात आल्या. 'विद्युत भवन' या परिमंडल कार्यालयात आल्यानंतर मुख्य अभियंता राजाराम माने व प्र.अधीक्षक अभियंता रूम देव चव्हाण यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना वीज सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. त्यांनतर स्वतःच्या व नागरिकांच्या विद्युत सुरक्षेबाबत सजग राहत अपघात टाळण्याची सामुहिक शपथ घेवून कार्यक्रमाची सांगता झाली.
नांदेड परिमंडळात महावितरण कंपनीचा २० वा वर्धापन दिनाच्या कार्यक्रमानिमित्त शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र या संकल्पनेनुसार दि. १ ते ६ जून २०२५ या कालावधीत वर्धापन दिन व विद्युत सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात येणार आहे.